# कर्मचारी टाइम्स

• मुंबई, १, मार्च २०२३ • वर्ष - १, अंक २ • पाने ८ • किंमत १० रुपये फक्त

शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त

Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India

www.karmacharitimes.com • संपादक - श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण Email - karmacharitimes@gmail.com


**महिला विशेष पुरवणी**

महाराष्ट्र राज्याच्या प्रशासकीय सेवेत महिला अधिकारी आणि कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या या कर्तृत्वाला तसेच कर्तव्यशील वृत्तीमुळेच राज्यातील जनतेचे कल्याणकारी हित साधले जात आहे. केवळ कर्तव्य नव्हे तर सामाजिक बांधिलकी देखील ही स्त्रीशक्ती दाखवत आहे. त्यामुळेच त्यांची दखल घेत ८ मार्च २०२३ या जागतिक महिला दिनानिमित्ताने विशेष पुरवणी (पान ८) प्रसिद्ध करत आहोत.

- संपादक 'कर्मचारी टाइम्स'


'कर्मचारी टाइम्स'

ALL-IN-1 QR CODE

वर्गणीदार व्हा...


## 'कर्मचारी टाइम्स'चे मुख्यमंत्र्यांकडून प्रकाशन

### कर्मचारी वर्गाकडून उत्साहात स्वागत

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या आणि राज्यभर कार्यरत असलेल्या सर्व वर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या लाखोंच्या संख्येत आहे. त्यांच्याशी संबंधित वृत्त, घडामोडी, कामगिरी, महत्वाची माहिती ही त्यांच्यापर्यंत पोहचावी तसेच सर्वसामान्य जनतेपर्यंतही त्या बातम्या पोहचाव्यात, यासाठी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी या कर्मचारी वर्गाचे व्यासपीठ ठरेल, असे **'कर्मचारी टाइम्स'** हे वृत्तपत्र सुरु केले आहे. त्याचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृहातील शानदार सोहळ्यात करण्यात आले.



या वृत्तपत्राचे प्रकाशन झाल्याचे समजल्यानंतर राज्यभर त्याचे जोरदार स्वागत करण्यात आले आहे.विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकण आदी विभागीय स्तरातून तसेच मुंबई, ठाणे परिसरात असलेल्या शासकीय कर्मचारी वर्गाकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला आहे.. त्याचबरोबर हे वृत्तपत्र कर्मचारी वर्गाचे मुखपत्र झाले असून यापुढील काळात ते अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा निर्धार कर्मचारी वर्गाकडून व्यक्त करण्यात आला आहे. प्रकाशन सोहळ्याच्या कार्यक्रमास वृत्तपत्राचे संपादक भाऊसाहेब पठाण, दी महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे चेअरमन रमेश लव्हांडे, कार्यकारी संपादक अशोक शिंदे, संघटनेचे बाबा कदम, विश्वास रणदिवे, सुधीर कोळवणकर, नंदकुमार साने, पराग आडिवरेकर, गुरुदत्त वाकदेकर तसेच मुख्य सल्लागार-माजी आमदार किरण पावसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर किंबहुना भारतात अशा प्रकारचा शासकीय कर्मचारी वर्गाने राबविलेला हा उपक्रम आहे. राज्य, केंद्र शासनाच्या सेवेत असलेल्या सर्व वर्गातील कर्मचाऱ्यांसाठी वृत्तपत्राचा प्रारंभ करण्यात आला आहे.

## १७ लाख कर्मचाऱ्यांचा १४ मार्चपासून जुन्या निवृत्ती वेतनासाठी बेमुदत संप

**मुंबई : जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात यावी, यासाठी राज्यभर शासकीय कर्मचारी वर्ग आक्रमक झाला आहे. त्यासाठी विविध संघटनांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलने सुरु केली असून त्याचे लोण आता राज्यभर पसरत आहे. शहरी, ग्रामीण तसेच जिल्हा व तालुका निहाय ही आंदोलने होत आहेत. तसेच राज्यातील सर्व कर्मचारी संघटनादेखील एकत्र येत आहेत. दरम्यान या सर्व संघटनांनी १४ मार्च २०२३ पासून बेमुदत संप जाहीर केला असून यात १७ लाख कर्मचारी सहभागी होणार आहेत.**

सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी याबाबत सांगितले, सर्वांत जिव्हाळ्याचा व भविष्यातील सुरक्षेची हमी असलेल्या जुन्या निवृत्ती वेतन योजनेची पुनर्स्थापना करा, या मागणीने संपूर्ण महाराष्ट्रात विशिष्ट वादळ निर्माण केले आहे. या मागणीबाबत शासन संदिग्ध भूमिका घेत असल्याचे पदोपदी जाणवत आहे. कर्मचारी वर्गाने अनेक आंदोलने करूनही शासनाने वेळ मारून नेली आहे. त्यामुळे एनपीएस हटविण्याबाबत शासनाची सध्या नकारात्मकता दिसून येत आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील शिक्षक तसेच कर्मचारी वर्ग खवळला आहे.

सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या घटक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची तातडीची सभा मुंबई येथे बॅलार्ड इस्टेट परिसरात झाली. सांप्रत राज्य शासनाने कर्मचारी व शिक्षकांच्या रास्त मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे शासनाप्रती सर्वदूर महाराष्ट्रात कर्मचारी शिक्षकांचा संताप अनावर झाला आहे. त्याबाबतच्या तीव्र भावना यावेळी करण्यात आल्या. यावेळी १४ मार्च २०२३ पासून बेमुदत संप करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व शासकीय कामकाज ठप्प होणार आहे.

मुंबईतील बैठक ९ मार्च २०२३ रोजी झाली. त्यानंतर लगेचच १२ फेब्रुवारी २०२३ रोजी नाशिक येथील नागरी सेवा प्रबोधिनीच्या सभागृहात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या कार्यकारिणीचीही महत्वाची सभा झाली. या सभेत १४ मार्चपासून बेमुदत संप करण्यासंदर्भात मंजूर झालेल्या ठरावावर जिल्हानिहाय चर्चा झाली. तसेच राज्यव्यापी बेमुदत संप करण्याच्या ठरावास एकमताने मंजुरी देण्यात आली. या बैठकीस राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण हेही उपस्थित होते. त्यांनीही या आंदोलनात १०० टक्के चतुर्थश्रेणी कर्मचारी सहभागी होतील, असा विश्वास व्यक्त केला तसेच त्या अनुषंगाने सर्व तयारीदेखील सुरु करण्यात आल्याचे सांगितले.

शासकीय कर्मचाऱ्यांचे नेते अशोक दगडे, प्रशांत जामदे, गणेश देशमुख देखील या वेळी उपस्थित होते. या सर्वांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, जुनी निवृत्ती वेतन योजना हा सर्वसाधारण कर्मचारी वर्गाचा हक्क आहे. उतारवयात त्यांच्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी असणारा तो एक मोठा आधार आहे. इंग्रजांच्या काळापासून सुरु असलेली ही योजना शासन बंद करत असून नवीन अंशदान योजने अंतर्गत सरकारी कर्मचारी यांचा पैसा शेअर बाजारात अडकविण्याची सरकारची योजना आहे.

बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचीदेखील मुंबईत जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथे सभा झाली. संघटनेचे अध्यक्ष मिलिंद सरदेशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत मंत्रालय, शासकीय मुद्रणालय, वस्तू व सेवा कर विभाग, सर्व शासकीय रुग्णालये, जे. जे. कामा आणि आल्बेस, गोकुळदास, तेजपाल, उद्योग संचालनालय, विज्ञान संस्था, लोकसेवा आयोग, एन.सी.सी., होमगार्ड, पोलिस रुग्णालय, सेंट जॉर्ज,विमा संचालनालय,कोकण भवन, पोलिस आयुक्तालय, कला संचालनालय, नर्सेस फेडरेशन, मत्स्य विभाग, अधिदान व लेखा कार्यालय, तंत्रशिक्षण विभाग आदी ४२ संलग्न संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## बेमुदत संपाबाबत मोर्चेबांधणी सुरु

**औरंगाबाद :** जुनी निवृत्ती वेतन योजना तसेच प्रलंबित मागण्यांबाबत होणाऱ्या बेमुदत संपाच्या पूर्वतयारीसाठी राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने मराठवाडा विभागात मोर्चेबांधणी सुरु करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश आहेरकर, कोषाध्यक्ष रामदास शिराळे तसेच आरोग्य विभाग राज्य संघटक रामभाऊ पांचाळ यांनी विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये दौरे केले तसेच स्थानिक संघटनांच्या पदाधिकारी आणि सदस्यांना मार्गदर्शन केले.

अंबाजोगाई रुग्णालय येथील कर्मचारी मागण्यांबाबत एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेस दीपक कांबळे मुकादम व स्थानिक अध्यक्ष शाम सरवदे राठोड, पुष्पा कचरे, दिलीप गालफाडे, अरुण गुन्हाल, नर्सेस फेडरेशनच्या अध्यक्ष बांगर म्याडम, छाया कांबळे आदी तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी उपस्थित होते. लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि लातूर रुग्णालय येथेही अशाच प्रकारच्या सभेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमात सुरेश आहेरकर, रामदास शिराळे आणि रामभाऊ पांचाळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी स्थानिक अध्यक्ष ख्वाजा शेख उपस्थित होते. उस्मानाबाद तुळजापूर सिव्हिल रुग्णालयात संघटनेच्या नामफलकाचे उद्घाटन करण्यात आले.

➪ छायाचित्रे पान ७ वर

## सरळसेवा भरतीसाठी राज्य शासनाची मान्यता

## राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचा विजय

**मुंबई :** राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे अखेर शासनाने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील वर्ग ४ ची सर्व पदे सरळसेवा पद्धतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे. तसा आदेश आरक्यूएन-११२१-प्र क्र. २५-वैसेवा-४ नुसार १४ फेब्रुवारी २०२३ रोजी उपसचिव वैशाली सुळे यांच्या सहीने निर्गमित करण्यात आला आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षे या विषयावर लढा देत असलेल्या भाऊसाहेब पठाण यांच्या प्रयत्नाला यश आले असून कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सर्व जिल्हाधिकाऱ्यांना या आदेशानुसार नवी भरती ३१ मार्च २०२३ पर्यंत करून त्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाला सादर करावयाची आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्ताने ७५ हजार पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याला मंत्रिमंडळानेदेखील मान्यता दिली आहे. जिल्हास्तरीय पातळीवर ही पदे भरण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यास सांगितले आहे. या यशानंतर आता राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाने आपला मोर्चा अन्य प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेकडे वळविला आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पाल्याला शासकीय सेवेत विनाअट कामावर घेण्याबाबत व १९८१ च्या अध्यादेश-नुसार त्याचा पाठपुरावा देखील सुरु आहे. त्याशिवाय सध्या सुरु असलेल्या जुन्या पेन्शन योजनेच्या अंमलबजावणीच्या मुद्याबाबत संघटनेच्या वतीने आंदोलनाची भूमिका जाहीर करण्यात आली आहे तसेच सर्व पातळ्यांवर प्रयत्न सुरु आहेत.

## बक्षी समिती अहवालाबाबत काही कर्मचारी वर्ग नाराज

**मुंबई :** बक्षी समिती खंड दोनमध्ये विशिष्ट संवर्गात असलेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांवर मोठा अन्याय झाला आहे. समान पद असूनही विशिष्ट विभागातीलच कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन लागू करण्यात आले आहे. यामुळे समिती अहवालावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ज्या पदांना सुधारित वेतन लागू केले आहेत अशा इतर विभागातील समान पदांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक होते परंतु खंड दोन नुसार समान पदांना सुधारित वेतन श्रेणी लागू न केल्याने मोठा अन्याय झाला आहे, असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

## राजपत्रित अधिकारी महासंघाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ या संघटनेचा ३७ वा वर्धापन दिन मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. मंत्रालयाच्या परिषद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर तसेच राज्यभरातील अधिकारी उपस्थित होते.



यावेळी महासंघाच्या वतीने उभारण्यात येणार असलेल्या कल्याण केंद्राच्या कामासाठी उल्लेखनीय निधी संकलन करणाऱ्या ११ समन्वय समिती सदस्यांचा मुख्य सचिवांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महासंघाच्या वर्धापन दिनी पाठवलेल्या शुभेच्छा संदेशाचे यावेळी वाचन करण्यात आले. मुख्य सल्लागार श्री. कुलथे यांनी कल्याण केंद्राचे स्वप्न सर्वांच्या सक्रियतेने आणि सहकार्याने निश्चित लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक अध्यक्ष विनोद देसाई यांनी केले. सरचिटणीस समीर भाटकर यांनी महासंघाच्या आगामी योजनांबाबत माहिती दिली. मीनल जोगळेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## निवृत्ती वेतन मेहरबानी नसून मूलभूत हक्क आहे

आयुष्याच्या सांजकाळातील आरोग्यविषयक तसेच दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या गरजा भागाव्यात, यासाठी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर पेन्शन देण्याचामागचा उदात्त हेतू आहे. डी. एस. नाकरा विरुद्ध युनियन बँक ऑफ इंडिया या बँकेच्या पेन्शनसंबंधीच्या खटल्यात दिनांक १७ डिसेंबर १९८२ रोजी म्हणजे ४० वर्षांपूर्वी न्यायनिवाडा देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने निवृत्ती वेतन म्हणजे उदारपणे कामगारांना देण्यात येणारी देणगी किंवा कृपादृष्टी अथवा मेहरबानी नसून सेवानिवृत्तांचा मूलभूत हक्क आहे. निवृत्तीवेतन हे अतिरिक्त वेतन नसून कामगारांनी जी सेवा केली, त्याचे वेतन आहे. असे आवर्जून नमूद केले आहे. त्या प्रित्यर्थ दरवर्षी १७ डिसेंबर हा दिवस पेन्शनर्स डे म्हणून देशभर पाळला जातो.

अधिकारी महासंघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी गेल्या ६ महिन्यांत ३६ जिल्ह्यांचे दौरे करून प्रलंबित समस्यांबरोबरच सद्यस्थितीतील नवीन पेन्शन योजना या जिल्ह्याळ्याच्या विषयासंबंधी अधिकारी व कर्मचारी वर्गाची मानसिकता सक्षम जाणून घेतली. राज्यात सध्या दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून सेवेत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना व नंतर दिनांक २७ ऑगस्ट २०१४ पासून राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे. अशा अधिकारी व कर्मचारी यांचे प्रमाण ४० टक्क्यांहून अधिक आहे. हे प्रमाण लवकरच ५० टक्क्यांच्या घरात जाणार आहे. त्या सर्वांचीच आग्रहाची मागणी आहे की, राज्य शासनाने नवीन पेन्शन योजना रद्द करून, पूर्वलक्षी प्रभावाने जुनी पेन्शन योजनाच लागू करावी. या रास्त मागणीला २००५ पूर्वी सेवेत आलेल्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचा पूर्ण पाठिंबा आहे.

यासंदर्भात महासंघाच्या दिनांक २३ फेब्रुवारी २०२२

**ग. दि. कुलथे**
संस्थापक व मुख्य सल्लागार
महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ

रोजी नियोजित लक्षवेधी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी महासंघाने दि. २२ फेब्रुवारी २०२२ रोजी तत्कालिन उपमुख्यमंत्री महोदयांसमवेत झालेल्या चर्चेमध्येही ही बाब प्रकर्षाने नजरेस आणलेली आहे. त्यावर शासन गांभीर्यपूर्वक विचार करून निर्णय घेईल, असे आश्वासन मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी राज्य शासनाच्या वतीने महासंघाला दिलेले आहे.

याबाबत दिनांक १९ सप्टेंबर २०२२ रोजी विद्यमान मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा केली असता, या विषयाचे महत्व त्यांनीही लक्षात घेतले असून वर्ष २००५ नंतर सेवेत आलेल्या अधिकारी व कर्मचारी वर्गाला जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा विषय मा. राज्यमंत्री समितीच्या कार्यकक्षेत अंतर्भूत करण्यासंदर्भात सकारात्मकता दर्शविलेली आहे.

नवीन पेन्शन योजनेत राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या पगारातून १० टक्के व शासनाचे १४ टक्के अशी एकूण २४ टक्के अंशदानाची रक्कम दरमहा शासनाकडे जमा होत असून, आतापर्यंत कपात झालेली अशी रक्कम सुमारे २२ हजार कोटी रुपये इतकी आहे. याशिवाय अन्य शासन अनुदानिक संस्था व महामंडळे यांच्यातील कर्मचारी व शिक्षक आदींकडून जमा रक्कम यापेक्षा खूपच मोठी असेल. राज्य शासनाने या संचित मोठ्या रकमेचा वापर सुनियोजितपणे जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी उपयोगात आणावा, यासाठी शासनाने प्राधान्याने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे, असे प्रस्ताव एकूण ४ वेळा महासंघाने राज्य शासनास दिले आहेत.

नवीन पेन्शन योजनेची सदोष अंमलबजावणी, तसेच गुंतवणूक व परतावा अविश्वासार्हता यामुळे नवनियुक्त अधिकारी व कर्मचारी आपल्या भवितव्याच्या दृष्टीने चिंतेत आहेत.

वस्तुस्थितीचा अभ्यास करूनच अलिकडे राजस्थान सरकारने सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात १ जानेवारी २००४ पूर्वी किंवा नंतर नियुक्त झालेल्या सर्व सरकारी कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घोषित केला असून त्यानुसार शासन निर्णयही निर्गमित केले आहेत. त्या अनुषंगाने १ एप्रिल २०२२ पासून नवीन पेन्शन योजनेंतर्गत मासिक वेतनातील १० टक्के कपात थांबवून कर्मचारी वर्गास वाढीव वेतन देण्यास सुरुवात केली आहे. त्याप्रमाणेच राजस्थान राज्यात अधिकारी वर्गाला अभ्यास दौरे आयोजित करून छत्तीसगड, पंजाब राज्यांनीही त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे.

वरील पार्श्वभूमीवर राज्य शासकीय सेवेतील ४ लाखांच्या वर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची भविष्यातील आर्थिक

➪ पान ५ वर

## शासकीय वसाहतीतील घरे कर्मचाऱ्यांच्या नावे करावी

**मुंबई :** वांद्रे भागातील शासकीय निवासस्थानात वास्तव्य करत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना ती घरे मालकी हक्काने करून द्यावीत, अशी मागणी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

या ठिकाणी हे कर्मचारी सुमारे ३५ वर्षांपासून राहत आहेत. घरे त्यांच्या नावे करण्याबाबत महाविकास आघाडीने अनुकूलता दर्शवली होती. त्या पूर्वी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी समिती गठित केली तसेच आश्वासन दिले होते याची आठवण पत्रात केली आहे.

Email - karmacharitimes@gmail.com

## महसूली कर्मचारी संघटनेच्या जालना जिल्ह्याची कार्यकारिणी





**जालना** : राज्य सरकारी गट ड चतुर्थ श्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र मंत्रालय मुंबई या महासंघाचे सहकोषाध्यक्ष आर. एस. शिराळे यांच्या अध्यक्षतेखाली जालना जिल्हा राज्य सरकारी गट ड चतुर्थ श्रेणी महसूली कर्मचारी संघटनेची बैठक घेण्यात आली.

बैठकीत त्यांची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर करण्यात आली अध्यक्ष एस. एच. पठाण, उपाध्यक्ष शेख अकबर, कार्याध्यक्ष संतोष कुलकर्णी, सचिव शाम विभुते, कोषाध्यक्ष विष्णु राठोड, प्रमुख सल्लागार लक्ष्मण रंगे, महिला उपाध्यक्षा एम. डी. वझरकर, सहसचिव डी. डी. काळे, संघटक अमोल शेळके, सहसंघटक राजू जाधव, मार्गदर्शक छाया कुलकर्णी, महिलाप्रमुख एम. बि. टेकाळे, महिला सदस्य नंदा पांडव, प्रसिद्धीप्रमुख मंगेश हारने तसेच या कार्यक्रमाला बहुसंख्येने कर्मचारी उपस्थित होते.

खेळीमेळीच्या वातावरण सर्वानुमते कार्यकारिणी जाहीर करण्यात आली तसेच बैठक संपन्न झाली.

यावेळी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तृतीयपंथीयांसाठी देशातला पहिला विशेष कक्ष मुंबईत

**मुंबई** : तृतीयपंथीयांसाठी देशातला पहिला ३० खाटांचा विशेष कक्ष मुंबईतील जी टी रुग्णालयात कार्यान्वित झाला आहे. महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते या विशेष कक्षाचं ई उद्घाटन करण्यात आले.

तृतीयपंथी हा देखील समाजाचा एक घटक आहे. सबका साथ, सबका विकास संकल्पनेच्या माध्यमातून या घटकातील लोकांच्या समस्या सोडविण्यावर भर देण्यात येत असल्याचं महाजन म्हणाले. या विशेष कक्षात तृतीयपंथीयांवर शारीरिक-मानसिक आजारांवर उपचार केले जाणार आहेत. वंचित घटक समजल्या जाणाऱ्या तृतीयपंथीयांच्या उपचारासाठी असा उपक्रम राबविण्यात आल्याबद्दल समाजात सकारात्मक भावना आहे. वर्षाच्या सुरूवातीला ते सुरु करण्यात आले असून रुग्णालयाच्या वॉर्ड क्रमांक १३, दुसरा मजला येथे हा कक्ष कार्यरत आहेत. उपचारासाठी तृतीयपंथीयाला ओळखपत्राची आवश्यकता आहे. स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. तसे नसेल तर स्वघोषित पत्र द्यावे लागेल.

# महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने अधिकाऱ्यांच्या हक्काचे बहुउद्देशीय 'कल्याण केंद्र'

**(गुरुदत्त वाकदेकर)**



**मुंबई** : महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने अधिकारी वर्गासाठी हक्काचे बहुउद्देशीय 'कल्याण केंद्र' उभे रहात आहे.

मोठी संघशक्ती असलेल्या महासंघाचे शक्तीपीठ म्हणजे कल्याण केंद्र अधिकाऱ्यांच्या विश्रामगृह, प्रशिक्षण व इतर सुविधासाठी अशाप्रकारच्या कल्याण केंद्राची उभारणी होत असून, त्यासाठी आवश्यक असलेली सर्व परवानापत्रे प्राप्त झाली आहेत व बांधकाम निविदा प्रक्रियेचे काम देखील अंतिम टप्प्यात आहे. देशभरामध्ये संघटनक्षेत्रात मानबिंदू ठरेल अशा नऊ मजली बहुउद्देशीय कल्याण केंद्र वांद्रे (पूर्व) येथे शशी प्रभू आणि असोसिएट्स (आर्किटेक्ट) आणि यु डी चांदे एलएलपी तसेच सर्वोत्कृष्ट वास्तुशिल्पीच्या देखरेखीखाली साकारले जात आहे.

कल्याण केंद्र उभारणीसाठी राज्य शासनाचे आवश्यक ते सर्व सहकार्य असून, अधिकाऱ्यांची सभासद वर्गणी व स्मरणिकेसाठी जाहिरातीच्या माध्यमातून बांधकामासाठीच्या आवश्यक निधी संकलनासाठी देखील नेटाचे प्रयत्न सुरु आहेत.

प्रत्येक अधिकाऱ्यांचे स्फूर्तीस्थान ठरेल, अशा या कल्याण केंद्राचे सभासद होण्यासाठी, राज्य शासनाच्या सर्व विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांनी प्रत्येकी किमान रु. ५ हजार या प्रमाणे सभासद वर्गणी जमा करुन, आपल्या सहकाऱ्यांनादेखील हा निधी देण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन ग. दि. कुलथे (मुख्य सल्लागार), विनोद देसाई (अध्यक्ष), सुदाम टाव्हरे (कल्याण केंद्र समन्वयक), नितीन काळे (कोषाध्यक्ष), समीर भाटकर (सरचिटणीस) यांच्याकडून करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून राजपत्रित अधिकारी वर्गाला त्यांच्या हक्काचे ठिकाण उपलब्ध होणार आहे. या केंद्राच्या स्थापनेसाठी गेली अनेक वर्षे होत असलेल्या प्रयत्नांना लवकरच यश मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**नियोजित कल्याण केंद्राची ठळक वैशिष्टे व माहिती** :-

• ठिकाण : गुरु नानक हॉस्पिटल जवळ, वांद्रे पूर्व,

• कनेक्टिव्हिटी : वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्सला लागून तसेच पश्चिम, मध्य, हार्बर लाईन्सला जोडणारे बीकेसी मेट्रो जंक्शन १०० मीटर अंतरावर

• वांद्रे आणि कुर्ला रेल्वे स्थानके २.५ किमी. च्या परिसरात

• देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ ४ किमी. परिसरात. मंत्रालय १६ किमी.परिसरात.

• जिल्हाधिकारी कार्यालय २०० मीटर परिसरात.

•१४ एकर भूखंडावर वसलेले २ बेसमेंट+तळ+८ मजले, ८६,००० चौ.फुट बांधकाम

• दोन लेव्हल बेसमेंट ४० कार पार्किंग व्यवस्थेचे असेल.

• ५५० चौ.फुटांचे प्रशासकीय कार्यालय असेल.

• व्यावसायिक वापर - ३,६१५ चौ.फुट

• ३० डिलक्स रूम, ३ व्हीआयपी सूट

• बहुउद्देशीय सभागृह २३४२ चौ.फुट (महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र खोल्या)

• वसतिगृह - ३,०९५ चौ.फुट ४० जणांसाठी (स्त्रिया आणि पुरुषांसाठी स्वतंत्र)

• डिजिटल लायब्ररीसह सुसज्ज कॉन्फरन्स हॉल २,०५० चौ.फुट आकारात असेल.

• कॅन्टीन आणि संलग्न पँट्री

• स्काय टेरेस गार्डन

• सर्व सदस्यांना बुकींगच्या सुलभतेसाठी स्मार्ट ओळखपत्रे

### कर्मचाऱ्यांसाठी जानेवारीपासून महागाई भत्यामध्ये वाढ

**मुंबई** : राज्य कर्मचाऱ्यांना लवकरच महागाई भत्ता मध्ये मोठी वाढ मिळणार आहे , केंद्रीय कामगार युनियनचे निर्देशांक जाहीर झालेले आहेत. केंद्रीय कामगार मंत्रालयाकडुन माहे डिसेंबर निर्देशांकाच्या आधारे महागाई भत्ता मध्ये ३ टक्के वाढ निश्चित करण्यात आलेली होती. परंतु कर्मचाऱ्यांना डी.ए. वाढ जानेवारी महिन्यापासून लगेच लागू न केल्याने, आता जानेवारी महिन्याच्या निर्देशांकाच्या आधारे महागाई भत्ता वाढ निश्चित होणार आहे. (ऑल इंडिया ग्राहक निर्देशांक) माहे सप्टेंबर महिन्यांपासूनच चढता आलेख दिसत आहे .

जानेवारीत भारताच्या स्टॉक मार्केटवर झालेला विपरित परिणामांमुळे मध्ये मोठी वाढ होणार आहे. निर्देशांक ३१.०१.२३ पर्यंत विचारात घेतले असता , केंद्रीय / राज्य कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता मध्ये ४.३५ टक्के वाढ होणे अपेक्षित आहे. म्हणजेच सरासरी डी.ए. ४ टक्के वाढ आहे. आता कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्या मध्ये ४ टक्के वाढ होणार आहे. सध्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना केंद्रीय व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ३८ टक्के महागाई भत्ता मिळत आहे.

# जिल्हाधिकारी चषक क्रिकेट स्पर्धा संपन्न

**सातारा** : सातारा जिल्हा राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मा. जिल्हा अधिक्षक वृषी अधिकारी विजयकुमार राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेचे हे १४ वे वर्ष असून या स्पर्धेमध्ये ३२ संघाना प्रवेश देण्यात आला होता.

या स्पर्धा संघटनेचे जिल्हा सरचिटणीस व या स्पर्धा समितीचे प्रमुख प्रकाश यांच्या मार्गदर्शना-खाली भरवल्या जातात. स्पर्धा भरवण्यामागचा उद्देश शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना खेळाचा आनंद घेता यावा अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी, गट नेतृत्व विकास, ताण-तणाव मुक्ती, शारिरीक व मानसिक तंदुरूस्ती, खिलाडूवृत्ती वाढीस लागावी. त्यांच्यातील सुप्तगुणांचा विकास व्हावा. नेतृत्व कौशल्य वाढीस लागावे, सर्व कार्यालयातील वातावरण खेळीमेळीचे राहावे. यासाठी मागील १३ वर्षापासून या सामान्यांचे आयोजन केले जात आहे.

या स्पर्धेचा वर्ग-१ अधिकारी ते वर्ग ४ कर्मचारी या स्पर्धेचा आनंद घेत आहेत. या स्पर्धेत या वर्षी खालील प्रमाणे बक्षीसे देण्यात आली.

**१) प्रथम क्रमांक** - विजेता जिल्हा न्यायालय अ संघ सातारा रुपये ३०,०००/- व फिरता चषक राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ महाराष्ट्र मुंबई-३२ यांच्या सौजन्याने.

**२) द्वितीय क्रमांक** - पाटण टिचर्स शिक्षक संघास रुपये २०,०००/- व चषक - कालीका देवीनागरी सहकारी पतसंस्था मर्यादित कराड यांच्या सौजन्याने.

**३) तृतीय क्रमांक** - वनविभाग सातारा संघास रुपये १०,०००/- व चषक - कै. कल्पना रविंद्र कळसकर यांच्या स्मरणार्थ संतोष रविंद्र कळसकर यांच्या सौजन्याने

**४) चतुर्थ क्रमांक** - जी एस टी विभाग संघास रुपये ५,०००/- व चषक कै. गणपतराव बाबुराव सातारा यांच्या स्मरणार्थ श्रीमती इंदुमती गणपतराव चतुर यांच्या सौजन्याने.

बक्षिस वितरण श्रीमती रोहिणी ढवळे मॅडम (उप मुख्यकार्यकारी अधिकारी) महिला व बाल कल्याण जि.प.सातारा) यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा अध्यक्षा श्रीमती सुरेखा चव्हाण, सरचिटणीस प्रकाश घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील सदस्यांनी परिश्रम घेतले. अनिल महामूलकर, विष्णू नलवडे, चंद्रकांत जाधव, प्रमोद चतुर, अरविंद, जी. व्ही. येळे, प्रमोद उगले, एम. एस. पांचाळ, लक्ष्मण भोसले, संतोष कळसकर, अशोक गोळे, शरद कनवाळू, विष्णू आवळे, श्रीकांत भोसले इत्यादिंनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केल्या.

पुढील वर्षी पुन्हा नव्या जोमाने सदर स्पर्धा भरवण्यात येणार आहेत. त्या सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने सहभाग नोंदवून स्पर्धा यशस्वी कराव्यात, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### र. ग. कर्णिक यांना शासकीय कर्मचाऱ्यांची श्रद्धांजली





राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे नेते स्व. रं.ग.कर्णिक यांच्या द्वितीय स्मृतीदिनी राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) मध्यवर्ती कर्मचारी महासंघाच्या वतीने राज्यभर श्रद्धांजली वाहण्यात आली. औरंगाबाद येथे डॉ. देविदास जरारे, वैजिनाथ विद्योतेकर, एन. एस. कांबळे, थोरात मॅडम, पुणे येथे मारूती शिंदे, कृष्णा साळवी, दिनेश कुचेकर, संध्या मॅडम तसेच पदाधिकारी यांनीही श्रध्दांजली अर्पण केली. र. ग. कर्णिक यांचे स्मारक मंत्रालय परिसरामध्ये उभारण्याची मागणी महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## आमदार निवासातले कर्मचारी न्याय्य हक्काच्या प्रतिक्षेत

**मुंबई** : मनोरा आमदार निवास येथे रिक्त जागांवरती आवश्यक कर्मचारी वर्गाची नेमणूक होत नसल्याने येथील कर्मचारी वर्ग हवालदिल झाला आहे.

ही नेमणूक प्रथमतः १५ दिवस खंड पद्धतीने करण्यात आली होती. मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेऊन ५०८ पदांची निर्मिती करून १६ सप्टेंबर २००५ रोजी कायम करण्यात आले. तसा शासन निर्णय काढण्यात आला असताना सुद्धा त्यांना जीपीएफ न देता अंशदायी निवृती वेतनामध्ये बसविण्यात आले. त्यामुळे त्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. तरी शासनाने यावर योग्य तो निर्णय घेऊन वरील कर्मचारी वर्गाला न्याय द्यावा, अशी विनंती कर्मचारी वृंदाकडून करण्यात येत आहे.

मुंबईमध्ये असणारे तीन आमदार निवास हे विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य यांना कमी पडू लागल्यामुळे मनोरा आमदार निवास १९९५-९६ च्या दरम्यान बांधण्यात आले. त्या ठिकाणी असलेल्या रिक्त जागांवरती आवश्यक कर्मचारी वर्गाची नेमणूक १५ दिवस खंड पद्धतीने करण्यात आली. ती नेमणूक १६/९/२००५ पर्यंत अशीच खंड पद्धतीने सुरू होती. त्यासाठी संघटनेला आंदोलने करावी लागली. त्यानंतर ५०८ पदांची निर्मीती करून १६ सप्टेंबर २००५ रोजी कायम करण्यात आले. तसा शासन निर्णय काढण्यात आला असतानासुद्धा जीपीएफ न देता अंशदायी निवृत्ती वेतनामध्ये बसविण्यात आले. त्यामुळे त्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे.

## कामगार कायदे बदलाविरोधात एकजुटीने लढा देण्याची गरज

### महाराष्ट्र हिंद मजदूर सभेचा निर्णय

**मुंबई** : केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाबाबत तसेच महाराष्ट्र सरकारने विधानसभेत चार लेबर कोड बाबतीत घेतलेला कामगार विरोधी निर्णय याबाबत महाराष्ट्रातील सर्व केंद्रीय कामगार संघटनांनी एकजूटीने लढा देण्याची काळाची गरज आहे, असे स्पष्ट उद्गार ज्येष्ठ कामगार नेते अॅड. एस.के.शेट्ये यांनी काढले.

महाराष्ट्र हिंदू मजदूर सभा संघटनेच्या महाराष्ट्र कौन्सिल कार्यकारणीची बैठक माझगाव येथील कामगार सदन सभागृहात संपन्न झाली. या सभेत चार लेबर कोड, नवीन पेन्शन योजनेला विरोध, असंघटित कामगारांचे प्रश्न, डिजिटल कॉइन, अधिवेशन, आंतरराष्ट्रीय महिला दिन अशा अनेक प्रश्नांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

याप्रसंगी ज्येष्ठ कामगार नेते अॅड. एस.के.शेट्ये, महाराष्ट्र हिंद मजदूर सभेचे अध्यक्ष शंकर साळवी, जनरल सेक्रेटरी संजय वढावकर, कार्याध्यक्ष सुधाकर अपराज, खजिनदार निवृत्ती धुमाळ, रेल्वे कामगारांचे नेते प्रदीप शिंदे, अरूण मनोरे, विकास गुप्ते, टाकसाळ क्षेत्रातील कामगार नेते सलीम झगडे,जहाज तोडणी उद्योगातील असंघटित कामगारांचे नेते विद्याधर राणे, महिला कामगार नेत्या संज्योत वढावकर, कल्पना देसाई, त्रिशीला कांबळे, शीला भगत इत्यादी मान्यवरांची कामगार चळवळीतील घडामोडीवर मार्गदर्शनपर भाषणे झाली. या सभेला बंदर व गोदी, रेल्व, मिंट टाकसाळ, शिपिंग, इंजीनियरिंग व केमिकल उद्योग मुंबई पालिका इत्यादी उद्योगातील कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

### माढा तहसील कार्यालयाला मिळणार नवीन इमारत

**माढा** : जुन्या इमारतीला पाडण्याची परवानगी मिळाली असल्यामुळे माढा तालुक्यातील तहसील कार्यालयाला नवी इमारत मिळणार आहे.

याबाबत बोलताना आमदार बबनराव शिंदे यांनी सांगितले की, अनेक दिवसांपासून ही अडथळ्याची शर्यत सुरु होती. आता याबाबतचे पत्र महाराष्ट्र शासननाचे सहायक सचिव अतुल कोदे यांनी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना दिले आहे. त्यामुळे लवकरच या कामाला सुरूवात होत आहे. सर्व कार्यालये आता एकाच ठिकाणी आल्याने नागरिकांसाठी सोयीचे होईल. यात तहसील कार्यालय, शासकीय कोठडी, उपकोषागार कार्यालय, तहसीलदार आणि उपनिबंधक तसेच निवडणूक विभागाचे कार्यालय, सेतू कार्यालय, शासकीय गोदाम यांची व्यवस्था असेल.

# कार्यालयीन जागांमध्ये दिव्यांगांकडे दुर्लक्ष

## २५ टक्क्यांपेक्षा कमी सुविधा

**अभ्यासात असेही दिसून आले आहे की, जेव्हा जाणीवपूर्वक दिव्यांगांच्या भरतीचा प्रश्न येती तेव्हा मुख्यतः त्या कनिष्ठ (२९.८४ टक्के) किंवा मध्यम (२३.२७ टक्के) स्तरांसाठी होतात. पदानुक्रमातील वरिष्ठ आणि व्यवस्थापन भूमिकांकडे जाताना कंपनीच्या संघटनात्मक रचनेत त्यांची उपस्थिती कमी होत जाते. २७.२ टक्के व्यावसायिक वरिष्ठ म्हणतात की, त्यांच्या संस्था दिव्यांगांचा समावेश सुधारण्यासाठी बाह्य संसाधनांशी भागीदारी करीत आहेत. हा एक सकारात्मक कल आहे जो संस्था जाणीवपूर्वक विचारात घेऊ शकतात, मात्र तरीही बहुसंख्य (४३ टक्के) प्रतिसादकांनी नमूद केले की, ते असे करत नाहीत. स्वयंसेवी संस्थाद्वारे केली जाणारी महत्वपूर्ण भूमिका म्हणजे दिव्यांगांचे कौशल्य वाढवणे जेणेकरुन ते नोकरीच्या बाजारपेठेत अधिक पात्र होतील. हे असे क्षेत्र आहे जे रोजगार क्षमता सुधारण्यासाठी, उत्तम प्रशिक्षण कार्यक्रम तयार करुन ते पुरवण्यासाठी आणि कामगार घेण्याची अंतर्गत धोरणे तयार करण्यासाठी मालकांकडून अधिक जास्त आणि मजबूत सहभागाची मागणी करते.**

**मुंबई** : भारतातील कार्यालयीन जागांमध्येच दिव्यांगांसाठी केवळ २५ टक्क्यांपेक्षा कमी सुविधा आहेत. भारतीय सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांमधील ६५ टक्के व्यावसायिक नेत्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे दिव्यागांना सामावून घेण्यासाठी धोरणे आहेत. यापैकी सर्वात मोठा हिस्सा (५० टक्के) बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून येतो तर सार्वजनिक क्षेत्र कंपन्यांमधून केवळ ४.५ टक्क्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे दिव्यांगांना समाविष्ट करण्यासाठी धोरणे आहेत, असा निष्कर्ष एम्ब्रेसिंग ऑल एबिलिटीज या रॅण्डस्टॅड इंडियाच्या समानता, वैविध्य आणि समावेशन या विषयावरील अभ्यासात आला आहे.

मानव संसाधन सेवा उद्योग क्षेत्रातील एक आघाडीची संस्था रॅण्डस्टॅड इंडियाने टॅलेंट मोबिलिटी सोल्यूशन्समधील अग्रगण्य रॅण्डस्टॅड राइजस्मार्ट नॉलेज पार्टनर वोकॅलियासह भागीदारीमध्ये समानता, वैविध्य आणि समावेशन या विषयावरील विशेष अभ्यासाची दुसरी आवृत्ती सुरु केली आहे. 'एम्ब्रेसिंग ऑल एबिलिटीज' असे त्याचे शीर्षक आहे. यावर्षी रॅण्डस्टॅडच्या 'समानता, वैविध्य आणि समावेशन' या बहुदृष्टिकोनात्मक अभ्यासामध्ये नियुक्ते किंवा मालक आणि कर्मचारी यांचे दृष्टिकोन एकत्रित करून मनोरंजक टेंड्र उलगडून दाखवले आहेत. ज्यामध्ये केवळ कार्यालयांमधील तरतुदी आणि धोरणांची उपस्थिती आणि अनुपस्थिती यांच्या पलीकडे जाऊन दिव्यांगांच्या (पीपल विथ डिसअॅबिलिटीज) अंतर्निहित भावनांचा समावेश आहे. या सखोल अभ्यासाचा भाग असलेल्या सुमारे ६५ टक्के व्यावसायिक वरिष्ठांनी असे मत व्यक्त केले की, त्यांच्या संस्थांकडे अपंग व्यक्तींना समाविष्ट करण्यासाठी धोरणे आहेत. यापैकी सर्वात मोठा हिस्सा (५० टक्के) बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून येतो, तर भारतीय खासगी क्षेत्रातील कंपन्यांचा केवळ १९ टक्के आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचा केवळ ४.५ टक्के हिस्सा आहे.

आणखी एक मनोरंजक निष्कर्ष असा आहे की, भारतीय सार्वजनिक क्षेत्र कंपन्यांमधील ६७ टक्के आणि ५५ टक्के भारतीय खासगी क्षेत्रातील प्रतिसादकांनी असे नमूद केले की, आमच्या कार्यालयात समावेशन तरतुदी आहेत, मात्र आमच्या उद्दिष्टांमध्ये त्या अनिवार्य नाहीत. तसेच सार्वजनिक क्षेत्रांमधील व्यावसायिक कंपन्यांच्या फारच कमी म्हणजे १७ टक्के नेत्यांनी नमूद केले की, त्यांच्या उद्दिष्टांमध्ये तरुतूदींचे समावेशन संरेखित आहे. दुसरीकडे, ५३ टक्के बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यावसायिक वरिष्ठांनी त्यांच्या उद्दिष्टांसह समावेशन संरेखित केले आहे. सार्वजनिक क्षेत्र कंपन्यांमधील ५० टक्के व्यावसायिक नेत्यांनी आणि भारतीय खासगी क्षेत्रातील कंपन्यांमधील २७ टक्के व्यावसायिक नेत्यांनी असे मत व्यक्त केले की, त्यांच्या संस्थांमध्ये दिव्यांगांबाबतची धोरणे योग्य नाहीत.

# शिक्षकांची ३० हजार पदे लवकरच भरणार

**सिंधुदुर्गनगरी :** शिक्षकांच्या जुन्या निवृत्ती वेतन योजनेबाबत कायदेशीर, आर्थिक बाबी तपासून सकारात्मक मध्यमार्ग काढू, तसेच शिक्षकांची सुमारे ३० हजार पदे लवकर भरली जातील, असे आश्वासन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

वेंगुर्ला येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या १७ व्या त्रैवार्षिक राज्य महाअधिवेशनाचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती राज्याध्यक्ष उदय शिंदे, माजी आमदार राजन तेली, निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत, जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, काळुजी बोरसे पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, शिक्षक हे भावी पिढीला आकार देण्याचं, संस्कारित करण्याचं अतिशय मोलाचं काम करत असतात. शिक्षकांचे समाजामध्ये मोलाचे योगदान आहे. समाज घडविण्याचे काम शिक्षक करतात. शिक्षकांवर जास्त बंधने लादली जाणार नाहीत. शासनाने गेल्या सहा-सात महिन्यांमध्ये शेतकरी, शिक्षक, कष्टकरी, कामगार तसेच विद्यार्थी या सर्वांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. जे निर्णय शासनाने घेतले आहेत ते निर्णय हे राज्याचे हित लक्षात घेऊनच घेतले आहेत. सर्वसामान्य घटक वंचित राहू नये, असे केंद्रबिंदू मानून निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील घटकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मुख्य प्रवाहात आणण्यासाठी निर्णय घेतले आहेत.

**पेन्शनबाबत सकारात्मक**

जुन्या पेन्शनचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा असल्यामुळे याबाबत कर्मचारी वर्ग अपेक्षा ठेवून आहेत, त्याचा विचार करत यावेळी शिक्षकांच्या पेन्शनबाबत कायदेशीर, आर्थिक तांत्रिक बाबी तपासून सकारात्मक मध्यमार्ग काढू, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, चंद्रपूरमधील पालडोह मधील शाळा ३६५ दिवस सुरु आहे. तोरणमाळ येथील शाळेला आदर्श शाळा पारितोषीक मिळाले आहे. शिक्षकांचे यासाठी समर्पण महत्वाचे आहे. ६१ हजार शिक्षकांसाठी ११ कोटी रुपये देण्याचा निर्णय तत्काळ घेतला. शिक्षकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले जाईल. शिक्षक हे ज्ञानदानाचे काम करत असतात. शिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे.

राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण सर्वेक्षणामध्ये शिक्षकांनी मोठी झेप घेतली आहे. यात सरकारी शाळांचा वाटा खूप मोठा आहे. पालक व समाजाचा सरकारी शाळेवरील विश्वास देखील आता वाढत चालला आहे. सरकारी शाळेतील विद्यार्थी कुठल्याही क्षेत्रात कमी नाही. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या कार्यमान प्रतवारी कामगिरी निर्देशांकात एकूण १००० गुणांपैकी महाराष्ट्राला ९२८ गुण मिळाले आहेत. त्यामुळे आपल्या महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आला आहे. यामध्ये शिक्षकांचे मोठे योगदान आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार मातृभाषेवरील शिक्षणावर भर दिला जाईल. इंग्रजी गणित व विज्ञान या विषयांची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी. यासाठी आपल्या सर्वांचे प्रयत्न सुरु आहेत. केंद्र सरकारचे नवीन शैक्षिणक धोरण ही भविष्य काळातील सुवर्णसंधी आहे. या धोरणानुसार राज्यातील सर्व मुला-मुलींना समान गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी राज्य शासनानेदेखील केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार दिशादर्शक काम करुन सर्वसमावेशक निर्णय घेतले आहेत. शिक्षण व्यवस्था दर्जेदार करण्यासाठी जी रिक्त पदे आहेत ती भरण्यात येणार आहेत. तसेच केंद्र प्रमुखाची रिक्त पदे भरण्याचे काम सुरु आहे. शिक्षकांच्या मागणीच्या सर्व त्रुटी दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करु, असेही ते म्हणाले.

शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री श्री. केसरकर म्हणाले, केंद्र प्रमुखांच्या रिक्त जागा शिक्षक भरती झाल्यानंतर येत्या ६ महिन्यांत भरल्या जातील. शिक्षकांच्या मानधनात वाढ व्हावी म्हणून मागणी होती. ती मागणी राज्य शासनाने पूर्ण केली आहे. १६ हजार, १८ हजार व २० हजार रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच विविध प्रवर्गात असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मानधनातही वाढ केली आहे. असे सांगून श्री. केसरकर म्हणाले विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांबद्दल प्रचंड आदर आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात येईल. कोणीही विद्यार्थी गणवेशा अभावी वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल.



राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ या संघटनेच्या मुख्य सल्लागारपदी ज्येष्ठ कामगार नेते तसेच माजी आमदार किरण पावसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीनंतर त्यांच्याशी संवाद साधताना संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण आणि पदाधिकारी. किरण पावसकर यांच्या कामगार क्षेत्रातील दीर्घकाळ आणि प्रभावी कार्याच्या अनुभवाचा तसेच मुत्सद्दीपणाचा संघटनेचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी निश्चित उपयोग होईल, असा विश्वास भाऊसाहेब पठाण यांनी व्यक्त केला आहे.

## अकोला कर्मचाऱ्यांकडून बक्षी अहवालाची होळी

**अकोला :** अकोला जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने अकोला जिल्हा परिषद प्रवेशद्वारासमोर बक्षी समितीचा निषेध करत त्या अहवालाची होळी करण्यात आली. समान काम समान वेतन या न्याय तत्वानुसार जिल्हा परिषद अंतर्गत लिपिक, परिचर, वाहनचालक इत्यादी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील तफावत दूर करण्यात यावी, तसेच जिल्हा परिषदच्या इतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या बक्षी समितीकडून मंजूर करण्यात आल्या नसल्याबद्दल यावेळी निषेध करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे राज्य सरचिटणीस सुनील जानोरकर, जिल्हाध्यक्ष गिरीष मोगरे, सचिव दिगंबर मालगे, संतोष ताथोड, तुषार पत्की, अभिजीत बन्नोरे, पुष्पक शहाणे, प्रवीण साखरे, गजानन उघडे, अंकुश पटेल, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवी काटे, विनोद जगताप, अविनाश बेलोकार, कैलास मसने, भारती देशमुख, अनुपमा पत्की, माधुरी कवीश्वर, पद्मा चंदन, अंकिता उइके आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, बक्षी समितीच्या अहवालाने निराशा केली असल्याच्या या कर्मचाऱ्यांच्या भावना आहेत.

## एस.टी. कर्मचाऱ्यांच्या समस्या अधिवेशनात लावून धरू: नाना पटोले

**मुंबई :** शिंदे फडणवीस सरकार एस.टी.महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर करू शकत नाही. पगार होत नसल्याने सांगली जिल्ह्यातील एस.टी. कर्मचारी भीमराव सुर्यवंशी यांना आत्महत्या करावी लागली ही लाजिरवाणी बाब आहे. एस.टी. कर्मचाऱ्यांच्या पाठीशी काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा असून अर्थसंकल्पीय अधिवेशान त्यांचे प्रश्न लावून धरू, कर्मचाऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन नाना पटोले यांनी केले आहे.

सरकारचा समाचार घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, एस.टी मंडळाला पगारासाठी दरमहिना ३६० कोटी रुपये लागतात, हा निधी महाविकास आघाडीचे सरकार असताना दिला जात होता.

कर्मचाऱ्यांनी मागण्यासाठी आझाद मैदानात संप केला तेव्हा त्यांच्या मागण्या मान्य करत महागाई भत्ता वाढवून २८ टक्के करण्यात आला, घरभाडे भत्ता व पगार वाढही देण्यात आली. या संपाच्यावेळीही काँग्रेस पक्ष व मविआ सरकार कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभे होते पण काहींनी राजकीय पोळी भाजण्यासाठी एस.टी. कर्मचाऱ्यांची दिशाभूल केली. तरी आता अधिवेशनात या सरकारला जाब विचारू आणि एस.टी. महामंडळाचे प्रश्न मार्गी लावण्यास भाग पाडू, असे नाना पटोले म्हणाले.

## १० हजार ग्रामसेवकांची लवकरच मेगा भरती

**मुंबई :** लवकरच १० हजार ग्रामसेवकांची भरती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ग्रामसेवक हा गावाचा महत्वपूर्ण भाग असतो. गावपातळीवर विकासकामांचा विचार करताना सरपंचासह गावात असलेल्या ग्रामसेवकाला महत्त्वाची भूमिका बजवावी लागते.

ग्रामसेवकाला ग्रामपंचायत सचिव-ग्रामविकास अधिकारी असे म्हणतात. या पदाच्या व्यक्तीला सरकारी नोकरीसह गावाची सेवा करण्याची संधी मिळत असते. भरती प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांसाठी सरकारने मोठा निर्णय जाहीर केला आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने दहा हजार पदांसाठी भरती करण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला आहे.

# नगररचना संचालकांना शिवीगाळ करणाऱ्यांना अटक करण्याची मागणी

**औरंगाबाद :** राज्याच्या नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाचे संचालक अविनाश पाटील यांना औरंगाबादेत काही जणांनी नुकतीच शिवीगाळ करुन धमकी दिली. त्याचा निषेध म्हणून औरंगाबाद महापालिकेत नियुक्त विकास आराखडा युनिटने काळ्या फिती लावून निषेध करून आंदोलन केले.



नगर रचना विभागाच्या वर्धापन दिनानिमित्त क्रीडा स्पर्धा आणि स्नेहसंमेलनासाठी संचालक अविनाश पाटील हे औरंगाबादेत आले होते. शहरातील प्रेसिडंट हॉटेल व लॉन्स येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात पाटील यांना शहर विकास आराखडा संघर्ष समिती अध्यक्ष, उपाध्यक्षांसह दहा ते पंधरा जणांच्या जमावाने शिवीगाळ करुन धमकावले. या प्रकरणी एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

आता या घटनेचा निषेध म्हणून विकास आराखड्याचे काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. औरंगाबाद शहराचा विकास आराखडा तयार करण्यासाठी राज्य सरकारने उपसंचालक रजा खान यांच्या नेतृत्वाखाली १८ जणांचे युनिट महापालिकेत नियुक्त केले आहेत. या युनिटच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम केले. लवकरच आमचे शिष्टमंडळ पोलिस आयुक्तांचीही भेट घेणार आहे, असे नगर रचना उपसंचालक रजा खान यांनी सांगितले आहे.

## अपंगांसाठी अ‍ॅट्रॉसिटी

**वाटूळ :** केंद्र सरकारच्या वतीने २०१४ च्या अधिनियमानुसार केलेल्या कायद्यात अपंग बांधव व कर्मचारी यांना कामाच्या ठिकाणी धमकी देणे, हिंसक वागणूक, छळ हा अजामीनपात्र गुन्हा नोंदवत अ‍ॅट्रॉसिटीचे कलम लावण्याची तरतूद करण्यात आल्याचे अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे जिल्हा सचिव आनंद त्रिपाठी यांनी सांगितले. याबाबत अशा कर्मचारी वर्गाच्या तक्रारी असल्यास संघटनेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष विलास गोरे यांनीही केले आहे.

कायद्यातील कलम ९२ अनुसार जर कोणी सार्वजनिक ठिकाणी अपमानास्पद वागणूक देत असेल तर या तरतूदींचा भंग झाल्याप्रकरणी दंडासह पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे.

# जलसंपदा विभागाच्या संघटनेच्या नामफलकाचे सातारा येथे उद्घाटन

**सातारा :** जल संपदा विभाग चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेच्या नामफलकाचे उद्घाटन राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष गणेश देशमुख, जिल्हा सरचिटणीस अंशुमन गायकवाड, राज्य सरकारी गट ड चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे राज्यसंघटक व सातारा जिल्हा सरचिटणीस प्रकाश घाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना भाऊसाहेब पठाण यांनी सांगितले की, सरकारचे धोरण कर्मचारी विरोधी असून सरळसेवा भरती मधून चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरती प्रक्रिया मधून वगळले आहे. अनुकंपा भरती करताना सुध्दा रिक्तपदाच्या २० टक्के इतकीच भरती केली जाते तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी सेवानिवृत्त झाले नंतर त्याच्या पाल्यास १४-४-१९८१ च्या शासन निर्णयानुसार वारसाहक्काने सामावून घेतले जायचे ते सरकारने आता बंद केले आहे. तसेच २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू नाही हे सर्व मिळवण्यासाठी येत्या १४ मार्चला राज्यव्यापी बेमुदत संपाचा निर्णय घेतला आहे. या संपात सहभागी व्हा, असेही त्यांनी सांगितले.

गणेश देशमुख व प्रकाश घाडगे यांनीही मनोगत व्यक्त केले. विष्णू चोरट यांनी आभार मानले. कार्यक्रमास कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

।।भावपूर्ण श्रद्धांजली।।



**प्रशांत नवघरे**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग सचिव प्रशांत नवघरे यांचे हृदयविकाराने निधन झाले.

मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार निवास कर्मचारी संघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

अध्यक्ष : विश्वास रणदिवे
कार्याध्यक्ष :विजय कनोजिया
पदाधिकारी व कर्मचारी वर्ग

# पोलिस दलातील कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करण्याची मागणी

**मुंबई :** पोलिस कर्मचाऱ्यांवर पदोन्नती व बदल्यांसंदर्भात होत असलेला अन्याय दूर करण्याची आवश्यकता आहे, असे महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

अत्यावश्यक सेवा असलेले गृह विभागांतर्गत एक महत्वाचे खाते आहे. बढत्या व बदली-संदर्भात अन्यायामुळे पोलीस दलात प्रचंड रोष असल्याचे प्रतित होत आहे. राज्यातील शेकडो पोलिस उपनिरीक्षक हे सहाय्यक निरीक्षक, सहाय्यक निरीक्षक हे निरीक्षकपदी व तद्नंतर पोलिस उपअधीक्षक पदी पदोन्नतीसाठी अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत आहेत.

पात्र असतानाही केवळ प्रशासकीय दिरंगाई होत असेल तर ते संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक ठरेल, म्हणून पदोन्नतीचे प्रस्ताव प्रत्येक विभागाने मार्गी लावावेत, याकरीता सा.प्र.वि.ने त्याचा आढावा घेऊन परिपत्रकाद्वारे स्पष्ट सूचना द्याव्यात, असे मुख्यमंत्र्यांनी दि. १९ सप्टेंबर, २०२२ च्या बैठकीत,तर मुख्यसचिवांनी अधिकारी महासंघासमवेतच्या दि. २२ जुलै, २०२२ रोजीच्या बैठकीत सामान्य प्रशासन विभागाला निर्देश दिलेले आहेत.

राज्य शासनातील असंघटीत असलेल्या या महत्वाच्या खात्यातील पदोन्नतीसंदर्भातील दिरंगाईचा वरिष्ठ स्तरावर प्राधान्याने आढावा घेऊन, रखडलेली पदोन्नती प्रक्रिया मार्गी लावून संबंधितांना दिलासा द्यावा, असे निवेदन महासंघाच्या वतीने ग. दि. कुलथे, विनोद देसाई यांनी दिले आहे.

## ८ हजार लॅबोरेटरी पॅथॉलॉजिस्टविना

**मुंबई:** राज्यात १३ हजार पैकी सुमारे ८ हजार लॅबोरेटरी या पॅथॉलॉजिस्टविना चालवल्या जात असून त्यातील ७० % शहरी भागात, महानगर पालिका कार्यक्षेत्रात असल्याचे महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट अँड मायक्रो-बायोलॉजिस्ट संघटनेकडून सांगण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार टेस्ट रिपोर्ट नोंदणीकृत पॅथॉलॉजिस्टनीच प्रमाणित करणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणीकृत नसलेली व्यक्ती आधुनिक वैद्यक शास्त्राचा व्यवसाय करीत असल्यास तो महाराष्ट्र वैद्यक व्यावसायिक अधिनियम १९६१ चा कलम ३३ नुसार गुन्हा ठरतो. असे असूनही अवैध तसेच नोंदणी नसलेल्या लॅब सर्रास सुरु असल्याचे याबाबत सांगण्यात आले.

# मुंबई सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रलंबित मागण्यांबाबत प्रस्ताव बैठक

**मुंबई :** मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार निवास कर्मचारी संघटनेच्या प्रलंबित मागण्यांबाबत प्रस्ताव तयार करण्यासाठी दिनांक १५ फेब्रुवारी २०२३ या दिवशी बांधकाम भवन पहिला माळा येथे अधीक्षिका चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये संघटनेचे अध्यक्ष विश्वास रणदिवे, कार्याध्यक्ष विजय कनोजिया, सरचिटणीस शशिकांत एन. सकपाळ, तृप्ती सावंत, उपसचिव सुनिल चाळके, कार्यालयातील कर्मचारी व सभासद यांच्यासह चर्चा करुन प्रस्ताव तयार करण्यात आला.


या प्रस्तावाचा तपशील असा - १) ४४४+९४ नियुक्तीची तारीख ग्राह्य धरण्यात यावी २) जुनी पेन्शन लागू करण्यासाठीचा प्रस्ताव ३) सा.बां.विभागामध्ये वर्ग(४) चारची रिक्त पदे सरळ सेवेत सामावून घेण्यात यावीत. ४) सफाई कामगार सेवानिवृत्ती व निधनानंतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यास (लाड समिती) नुसार त्वरित कामावर घेण्याबाबत आणि बऱ्याच मागण्या अधीक्षिका चव्हाण यांनी मान्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

या सर्व मागण्यांबाबत लवकरच कार्यकारी अभियंता साहेब यांच्याबरोबर बैठक घेण्यात येईल व आपल्या कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावाला मान्यता देतील व आपला प्रस्ताव मंत्रालयामध्ये मान्यतासाठी लवकरात लवकर पाठवला जाईल. या प्रस्तावाचा नियमित पाठपुरावा करण्याचे संघटनेच्या वतीने निश्चित करण्यात आले आहे. तसेच शासनानेदेखील लवकर प्रश्न सुटतील, याच्याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन संघटनेने केले आहे.

## सुधारित आरोग्य योजना लागू करण्याची मागणी

**मुंबई :** राज्य शासकीय कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत सुधारीत कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

अधिकारी-कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना सद्यस्थितीत वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे प्रस्ताव सादर केल्यापासून प्रतिपूर्ती होईपर्यंत अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा कटू अनुभव संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना येत आहे, असे या निवेदनात संघटनेचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर यांनी नमूद केले आहे.

हार्दिक शुभेच्छा...

रवि शिराळे
SMARAT
PLY/MICA/DOOR
Inspired by nature
SAIDWAR
PLYWOOD & HARDWARE
फायबर डोअर, सागवान डोअर, फ्लश डोअर, विनियर डोअर, पीव्हीसी डोअर
-: संपर्क :-
शॉप नं. २, भागचंद कॉम्प्लेक्स, अंबड चौफुली, जालना - ४३१२०३.
फोन नं. : ०२४८२-२२४४५८
ई मेल : saidwardoor@gmail.com
रवि शिराळे
+९१-९८२३८ ४६३३३
+९१-९८२३८ ४५००१

संपादकीय

# पेन्शन आंदोलनला आता चळवळीचे रुप !

जुनी पेन्शन लागू व्हावी, यासाठी शासकीय कर्मचारी वर्गाची मागणी आणि लढा चळवळीचे रुप घेत आहे. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक संघटनांकडून ही मागणी जोर धरू लागली आहे. नुकत्याच झालेल्या पदवीधर मतदारसंघ निवडणूकीत देखील याचे पडसाद दिसून आले. अनेकांनी जुनी पेन्शन योजना लागू करावी, असा शेरा मारत मतदान केले. नो पेन्शन नो वोट, हे साधं एक वाक्य असलं तरी आगामी काळात निवडणुकांत तेच वाक्य एक स्लोगन बनण्याच्या तयारीत आहे. औरंगाबादसह अनेक ठिकाणी बाद मतपत्रिकांवर हा मजकूर आढळून आला. जे जुनी पेन्शन देणार नाहीत, त्यांना मतं मिळणार नाहीत, असं अनेक मतदारांनी मतपत्रिकांवर लिहिलं. राज्य दिवाळखोरीत निघेल या शक्यतेनं जुनी पेन्शन योजनेस नकार दिला जातो. मात्र जर जुनी पेन्शन लागू करणं छत्तीसगड, राजस्थान, पंजाब किंवा हिमाचल प्रदेशसारख्या राज्यांना जमत असेल, तर मग महाराष्ट्राला का जमत नाही? असा प्रश्न उपस्थित केला जातोय. २०२२-२३ सालात छत्तीसगडचा जीडीपी ४ लाख ३४ हजार कोटी होता. पंजाबचा ६ लाख २९ हजार कोटी, राजस्थानचा १३ लाख ३४ हजार कोटी नि महाराष्ट्राचा जीडीपी तब्बल ३५ लाख ८१ हजार कोटी आहे. म्हणजे छत्तीसगड, पंजाब आणि राजस्थान या तिन्ही राज्यांचा जीडीपी जरी एकत्र केला तरी महाराष्ट्राहून जवळपास साडे ११ लाख कोटीनं कमी आहे. याबाबत २०१७-१८ च्या आकडेवारीप्रमाणे सरकारी कर्मचाय़ांचा आकडा बघितला तर छत्तीसगडमध्ये २ लाख ६० हजार सरकारी कर्मचारी, पंजाबमध्ये ३ लाख ५० हजार, राजस्थानात ६ लाख ५० हजार तर महाराष्ट्रातल्या सरकारी कर्मचाऱ्यांचा आकडा ७ लाख ५० हजार आहे. जर राज्यांचं उत्पन्न बघितलं तर छत्तीसगडचं ७०२ कोटी, पंजाबचं १२ हजार ५५४ कोटी, राजस्थानचं २३ हजार ४८९ कोटी आणि महाराष्ट्राचं २४ हजार ३५३ कोटी. त्यामुळे राज्य शासन आता तरी या मुद्याकडे गांभीर्याने बघेल आणि शासकीय कर्मचारी वर्गासाठी अत्यंत संवेदनशील असलेल्या या प्रश्नाला न्याय देईल, अशी भाबडी अपेक्षा ठेवायला हरकत नाही. आता जुनी पेन्शनचा मुद्दा फक्त महाराष्ट्रासाठीच सिमीत आहे असं नाही तर जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी सध्या आंदोलन सुरु असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, गुजरात, जम्मू-काश्मीरसह अनेक राज्यात आंदोलनं होतायत. जुनी पेन्शनमध्ये निवृत्तीवेळच्या पगाराची निम्मे रक्कम पेन्शन मिळायची. नवी पेन्शन योजना सहभागाची आहे, ज्यात फक्त ८ टक्के रक्कम मिळते. तुमचा पगार ६० हजार असेल तर जुनी पेन्शन योजनेत ३० हजार पेन्शन बसायची. नवी पेन्शन योजनेत ३० हजार पगारावर ४४०० रुपये पेन्शन बसते. जुनी पेन्शन नोकरदाराला पगारातून रक्कम द्यावी लागत नव्हती. नवी पेन्शनमध्ये दर महिन्याच्या पगारातून १० टक्के रक्कम कर्मचारी आणि त्यावर १४ टक्के रक्कम सरकार देतं. जुनी पेन्शन योजनेत जास्तीत जास्त पेन्शन ही ९१ हजारांपर्यंत होती. नवी पेन्शन योजनेत जास्तीत जास्त पेन्शन ही ७ ते ९ हजारांपर्यंतच मिळते. महाराष्ट्रात २००५ पासून निवृत्त कर्मचाऱ्यांला पेन्शन बंद झालीय. मात्र निवृत्त आमदारांना पेन्शन अद्यापही सुरु आहे. हा विरोधाभास ध्यानात घ्यायला हवा. ६० वर्ष नोकरी करुन एखादा कर्मचारी निवृत्त झाला, तरी तो जुनी पेन्शन योजनेस पात्र नाही. पण एखादा नेता जर फक्त एक टर्म आमदार झाला, तरी त्याला हयातभर पेन्शन मिळते. नवी पेन्शन योजनेनुसार निवृत्त कर्मचाऱ्यांस किमान १५०० ते जास्तीत-जास्त ७ हजार रुपये पेन्शन मिळते. तर निवृत्त आमदारांना किमान ५० हजार ते सव्वा लाखांपर्यंत पेन्शन दिली जाते. या घडीला महाराष्ट्र राज्यात स्वरूपसिंग नाईक, पद्मिसंह पाटील, मधुकर पिचड, जिवा पांडू गावित, सुरेश जैन, रोहिदास पाटील, रामदास कदम, अनंतराव थोपटे, विजयसिंह मोहिते पाटील, एकनाथ खडसे, आणि प्रकाश मेहता या नेत्यांना १ लाखांहून जास्त पेन्शन मिळते. त्यामुळे जनतेमध्ये आणि शासकीय कर्मचारी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण होत आहे, हे शासनाने ध्यानात घ्यायला हवे. याबाबत एक सकारात्मक आणि आशेचा किरण दिसत आहे तो म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या जुन्या पेन्शन योजनेबाबत दाखविलेली सकारात्मकता. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यास अनुकूल आहेत का, याबाबत कर्मचारी वर्गात साशंकता आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की, दोघांनीही मिळून सामंजस्याची भूमिका घेतली पाहिजे. या योजनेवरून सरकारमध्ये मतभेद आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरकारमधील प्रमुख पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याचं स्वागत आहे. पदवीधर मतदारसंघातील निवडणूकांची आचारसंहिता संपल्यानंतर सरकारकडे बैठक लावणार', असं चंद्रशेखर बावनकुळे अकोल्यात म्हणाले होते. त्यांना त्यांच्या या विधानाची यानिमित्ताने आठवण करून देत आहोत. जुनी पेन्शन योजना राष्ट्रवादी काँग्रेसनं बंद केली आहे, असाही आरोप केला जात आहे. या सर्व राजकीय धुमाळीत शासकीय कर्मचारी वर्ग मात्र भरडला जात आहे, याची जाणीव राजकीय पक्षांनी ठेवायला हवी.

# राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना

राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेमध्ये अपघातामुळे कायम स्वरूपाचे अपंगत्व/विकलांगात्व आल्यास व त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांच्या उपजीविकेस धोका निर्माण झाल्यास त्याला ठोस रक्कमेच्या स्वरूपात नुकसान भरपाई देण्याकरिता राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना सुरू शासन निर्णय दि ०४/०२/२०१६ नुसार दि. ०१/०४/२०१६ पासून लागू करण्यात आली आहे. शासन निर्णय दि. १८/०२/२०१७ नुसार सदर राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना महाराष्ट्र संवर्गातील भारतीय प्रशासकीय सेवेतील, भारतीय पोलीस सेवेतील व भारतीय वन सेवेतील अधिकारी तसेच सर्व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच, प्रतिनियुक्तीवर असलेले अधिकारी / कर्मचारी यांना देखील दि. ०१/०४/२०१७ पासून लागू करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ११/०८/२०१७ नुसार राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना निमशासकीय स्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली आहे.

प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व निमशासकीय कार्यालय, जिल्हा परीषद,पंचायत समिती, ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, शासकीय महामंडळे, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, संवैधानिक संस्था, मान्यता व अनुदान प्राप्त शैक्षिणक संस्था/महाविद्यालये, कृषी विद्यापीठे, पारंपारिक विद्यापीठे अधिकारी/कर्मचारी (कंत्राटी कर्मचारी वगळून ) यांना दि. ०१/०४/२०१७ पासून लागू करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ५ मार्च २०१९ नुसार राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना या योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

कालबद्ध पदोन्नती योजने-अंतर्गत किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वरिष्ठ वेतनश्रेणीच्या अनुषंगाने त्यांच्या मूळ पदाचा विचार न करता अपघात विमा योजनेची वर्गणी घेण्यात यावी व त्याप्रमाणे लाभ अनुज्ञेय करावे. कर्मचाऱ्यांकडून वर्गणी घेताना तो ज्या पदाचे वेतन घेत आहे. त्या पदाच्या गटाप्रमाणेच वर्गणी घेण्यात यावी व लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत. तथापि, योजना वर्षाच्या कालावधी त्या पदाचा गट बदलला तर त्यापुढील योजना



वर्षाची वर्गणी व अनुज्ञेय लाभ यामध्ये बदल होतील.

योजनेतील सुधारणेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालय प्रमुख्यांने त्यांच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून अपघात विमा वर्गणी माहे फेब्रुवारी, २०२३ देय मार्च २०२३ च्या वेतनातून व तदनंतर दरवर्षी कपात करणे आवश्यक आहे.

राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी वसूल करण्याची जबाबदारी सदस्य कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या आहरण व सांवविरण अवधकारी यांची आहे. राज्य शासकीय कर्मचारी कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना आणि राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना-१९८२ या स्वतंत्र असतील.

योजनेचा लाभ खालील कारणाकरीता देता येणार नाही.

१. नैसर्गिक मृत्यू.

२. आत्महत्या वा तसा प्रयत्न.

३. जाणीवपूर्वक जखम

४. अंमली किंवा मादक पदार्थांच्या अतिसेवनाने मृत्यू.

५. कोणत्याही प्रकारच्या स्पर्धामध्ये मृत्यू झाल्यास.

६. शिकार, गिर्यारोहण.

७. योजनेच्या सभासदाच्या मृत्यूस त्यांच्या वारसदार /वारसदारांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्यास अशा वारसदारांना.

८. प्रसुती किंवा बाळंतपणा दरम्यान मृत्यू किंवा विकलांगता आल्यास.

९. गुन्हेगारी उददेशाने कोणत्याही कायदयाचे उल्लांघन केल्यामुळे आलेला मृत्यू किंवा विकलागांत्व.

१०.गुप्त रोग किंवा वेडसरपणा यामुळे आलेला मृत्यू किंवा विकलागंत्व.

११. किरणोत्सर्ग, अणुभट्टया, युध्द व बंड इत्यादी तत्सम करणांमुळे उद्भवलेला मृत्यू किंवा विकलांगत्व.

सदस्यास विमा रक्कमेचे प्रदान खालील नियम, अटी व शर्तीच्या अधीन देय असेल.

१. सदस्यत्व स्वीकारातांना नामनिर्देशन करणे अवश्यक आहे.

२. अपघाती मृत्यु किंवा अपंगत्व/विकलांगता आहे. अशा प्रकरणाची प्रकरणात आवश्यक त्या परिस्थितीत पोलिसांकडे एफआयआर नोंदवणे आवश्यक आहे.

३. अपघातामुळे कायमचे आंशिक अपंगत्व/विकलांगता आली आहे. ही बाब जिल्हा शल्य चिकीत्सकाने किंवा विमा सांचालक यांनी मंजूर केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पॅनलमधील चिकित्सक यांनी प्रमाणति करणे आवश्यक आहे.

४. सदस्याने किंवा त्याच्या नामनिर्देशीत वारसदाराने संबंधीत कार्यालय प्रमुखामार्फत विमा दावा दाखल करणे आवश्यक आहे.

५. जर एखाद्या सदस्याने नामनिर्देशन पत्र दिले नसेल किंवा त्याने दिलेले नामनिर्देशन पत्र

संपूर्णत: किंवा अशंत: अग्राह्य असेल तर विमा योजनेनुसार देय होणारी रक्कम सदस्यांच्या मृत्यूनंतर ज्या व्यक्तीस न्यायालयाकडून उत्तराधिकार प्रमाणपत्र मंजूर करण्यात आललेल आहे. अशा व्यक्तीस विमाछत्राची रक्कम प्रदेय राहील.

राष्ट्रीय पेन्शन योजनेमध्ये कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शनप्रमाणे पेन्शन तर मिळतच नाही . परंतु या योजनेच्या माध्यमातुन कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ घेण्याकरीता अनेक गोपनीय जाचक अटी घालण्यात आलेल्या आहेत. कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास कर्मचाऱ्यांस राष्ट्रीय पेन्शन योजनेत जमा असणाऱ्या रक्कमेपैकी केवळ २० टक्केच रक्कम काढता येते. जे कि , जुन्या पेन्शनमध्ये कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यातील रक्कम केव्हाही काढू शकतो. शिवाय सेवानिवृत्तीनंतर भविष्य निर्वाह निधी खात्यातुन १०० टक्के रक्कम काढू शकतो .परंतु राष्ट्रीय पेन्शन योजनेमधून केवळ २० टक्के रक्कमच काढू शकतो. जमा रक्कम केवळ वारसांना मिळणार राष्ट्रीय पेन्शन योजनेतील जमा रक्कम कर्मचाऱ्यांस मिळणार नाही.

जमा रक्कमेवर अवलंबून कर्मचाऱ्यांस पेन्शन मिळेल. कर्मचाऱ्यांची इच्छा असताना देखील राष्ट्रीय पेन्शन मधील जमा रक्कम काढू शकणार नाहीत. जमा रक्कम ही कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना सदरची रक्कम मिळेल.

जमा रक्कमेच्या व्याजावर आधारित पेन्शन व्यवस्था राष्ट्रीय पेन्शन योजना ही एक व्याजावर आधारित पेन्शन योजना आहे . बँकेमध्ये मुदत ठेव केल्यानंतर जे व्याज मिळते त्याच पद्धतीने ही रक्कम आपल्या जमा रक्कमेवर व्याज स्वरुपात पेन्शन मिळते, अशा पद्धतीने ही पेन्शन व्यवस्था आहे.

# सरकारी नोकरीतून निलंबन होते म्हणजे नेमके काय?

शासकीय सेवेत असलेल्या सरकारी माणसाला सरकारचा जावई म्हणण्याची पद्धत तशी जुनीच आहे. या प्रश्नाचं आणि या वाक्याचा काय अर्थ? ते खाली वाचल्यावर कळेल. सरकारी कर्मचारी असो की अधिकारी, त्यांना वागण्याचे, बोलण्याचे, वेळ पाळण्याचे, वेळेत काम करण्याचे, किंवा गैरहजर न राहण्याचे, नशा न करण्याचे असे अनेक बंधनं घातली असतात त्याला आपण साध्या भाषेत काय करावे व काय करू नये असं म्हणू शकतो.

सरकारी भाषेत यासाठी

१. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या अटी व शर्ती) नियम १९८१

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९

३. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९

४. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१

५. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१

असे नियम आहेत. व गरज पडेल तशी त्यात सुधारणा होत असतात.

या नियमांपैकी एक म्हणजेचं निलंबन. म्हणजेच नियमांचं उल्लंघन. ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांला शासकीय कामात जे करायला मनाई केली आहे जसे नशा करणं, उशीरा येणं, गैरहजर असणं, दिलेलं काम वेळेत पूर्ण न करणे, केल्यास सदोष करणे, काही अनियमितता असणं किंवा त्याला शासकीय नोकर म्हणून जे अधिकार दिले आहेत त्या अधिकारांचं उल्लंघन केलं जातं असेल, खोटी, चुकीची माहिती शासनाला कळवली गेली असेल तर तो अधिकारी कर्मचारी निलंबित केला जातो.

निलंबित केले म्हणजे काही काळासाठी त्याला शासकीय सेवेतून कमी केल्या जाते. असा आदेशच निघतो ज्याची सेवा पुस्तकात नोंद होते.

शासकीय सेवेतून कमी करणे म्हणजे नोकरीतून काढून टाकणे नाही तर त्याच्या वर आरोपामुळे त्याच्याकडे वित्तीय बाबीविषयक कामकाज दिले जात नाही.

तसेच निलंबित झाल्यानंतर तो कार्यरत कार्यालयामध्ये तपासात अडथळा आणू शकतो म्हणून त्याची नियुक्ती दुसऱ्या कार्यालयामध्ये केली जाते. तिथे त्याच्याकडे कमी महत्त्वाचे काम असते आणि हजेरीपटावर स्वाक्षरी करणे गरजेचे असते.

काही अपहार, अनियमितता केल्यास त्या कर्मचाऱ्यांला त्याचे प्राधिकृत अधिकारीच (म्हणजे नोकरीच्या आदेशावर ज्यांची स्वाक्षरी आहे असा अधिकारी) निलंबित करू शकतात. उदा. मी माझ्या कार्यालयाचा अधिकारी आहे म्हणून मी माझ्याकडे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याला निलंबित करू शकत नाही तर मी तसे तस्तावेज माझ्या वरिष्ठांना पाठवून निलंबित करण्याचे सांगू शकतो. तो वरिष्ठ सुचवलेल्या कर्मचाऱ्यांचे प्राधिकृत अधिकारी असतील तर निलंबित करतील किंवा त्यांच्या वरिष्ठांकडे तस्तावेज पाठवतील.

निलंबन करण्यासाठी सबळ लेखी पुरावे जोडणं महत्त्वाचे असते, नाहीतर जाणीवपूर्वक निलंबनाची कार्यवाही केली म्हणून ते प्रकरण अधिकाऱ्यांच्या अंगलट सुद्धा येऊ शकते.

निलंबनानंतर त्या व्यक्तीचा पगार सुरु राहतो. निलंबित कर्मचारी हा शासकीय नोकर असल्याने व त्याच्यावरील आरोप अद्याप सिद्ध न झाल्याने याला निलंबनापासून पहिल्या तीन महिने पर्यत त्याच्या पगाराच्या अर्धा पगार मिळत असतो. या तीन महिन्यांत प्रकरणाचा तपास पूर्ण न झाल्यास त्यांनंतर पगाराच्या ७५% पगार मिळतो आणि या तपासात निलंबित कर्मचाऱ्यांने व्यत्यय आणला तर पगाराच्या २५% पगार मिळतो.

दरम्यानच्या काळात त्याला कुठलाही व्यवसाय, दुसरी नोकरी करता येत नाही.

जर तपास पूर्ण झाला आणि कर्मचारी निर्दोष सिद्ध झाला तर त्याची सेवा नियमित होऊन राहिलेला पगार मिळतो.

अलीकडे सेवा नियमित केली जाऊन वेतनवाढ रोखली जात असल्याचे सुद्धा दिसते.

मात्र आरोप सिद्ध झाल्यास आरोपानुसार शास्ती (आर्थिक दंड) लावली जाते, वेतनवाढ रोखली जाते आणि आरोप गंभीर असतील तर क्वचित प्रसंगी बडतर्फ (नोकरीतून पूर्ण काढून टाकणे) केले जाते.

निलंबित कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी केली जाते . साधारणपणे कोर्टात जसे कामकाज चालते त्याच धर्तीवर या चौकशीचे काम चालते. कर्मचाऱ्यांवर जे दोषारोपपत्र दाखल झालेले असते त्याबद्दलचे पुरावे, साक्षीदार, तपासणी, उलटतपासणी होते. जर दोषारोप सिद्ध झाले तर चौकशी अधिकारी नोकरीतून मुक्त करणे, ठपका ठेवणे, एक किंवा अधिक वेतनवाढी रोखणे, शासनाची वाया गेलेली रक्कम वसूल करणे अशा शिक्षा देतात. विभागीय चौकशी दरम्यान ५०% वेतन मिळते पण शासनाच्या परवानगी शिवाय मुख्यालय सोडण्यास, परदेश प्रवासासाठी जाता येत नाही.

चौकशीत कर्मचारी निर्दोष आढळून आल्यास त्याला वेतनामधील फरकाची रक्कम मिळून तो पदोन्नती व इतर शासकीय लाभासाठी पात्र होतो . एका कार्यकारी अभियंत्याला निलंबित करण्यात आले व विभागीय चौकशी कित्येक वर्षे चालली. चौकशीअंती ते निर्दोष झाले . सेवाज्येष्ठतेमुळे ते मधील एक पायरी (अधिक्षक अभियंता) वगळून मुख्य अभियंता झाले . विभागीय चौकशी कायम योग्य कारणासाठी होते असे नाही . कधी कधी एखाद्या प्रश्नावरून लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी अधिकाऱ्यांला ताबडतोब निलंबित करण्यात येते. अशा बळीच्या बकऱ्यांची संख्या पोलीस खात्यात बहुसंख्येने पहायला मिळते त्याला परत कामावर घ्यायचे की नाही हे निलंबित तात्पुरते केले की कायम स्वरूपी केले यावर अवलंबून असते. परंतु कायम स्वरूपी निलंबन हे सहसा शक्य नसते व त्याची प्रक्रिया थोडी किचकट आहे. तसेच अश्या प्रकारची प्रकरणे कमी असतात.

तात्पुरते निलंबन हे प्रत्येक कार्यालयात होत असते. या निलंबनास अनेक करणे असू शकतात. या काळात त्याला अर्धापगार मिळत असतो. परंतु या कारवाईने सेवा पुस्तक खराब होत असते व त्याने पदोन्नती मिळण्यास अडचण निर्माण होत असते. त्यामुळे तात्पुरते निलंबन अर्धा पगार मिळत असेल तरी हे निलंबन प्रत्येकास नकोसे असते. तसेच सर्व कर्मचारी व सामाज त्या कर्मचाऱ्यांकडे एक वेगळ्या नजरेने बघतात. पण निलंबन कालावधी, चौकशी कालावधी संपला की परत त्या व्यक्तीला कामावर रुजू करून घेत असतात. परंतु निलंबन कोणतेही असले तरी त्याच्या विरुद्ध आपण न्यायालयात दाद मागू शकतो. अनेकदा कार्यालयातील अंतर्गत वाद या कारणाने अनेकदा अश्या बाबींना सामोरे जावे लागते. चूक नसताना, कपट मनात ठेवून अश्या कारवाया केल्या जातात म्हणून आपण याच्या विरुद्ध कोर्टात दाद मागू शकतो व आपल्याला लागलेला कलंक पुसून काढू शकतो.

निलंबनाची प्रक्रिया ही क्लेशदायी असते. प्रत्येकासाठी ती त्रासदायक असते. त्यामुळे या प्रक्रियेत आपण येऊ नये, याचा प्रयत्न प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. काही वेळा वरिष्ठांकडूनही नाहकपणे निलंबन होते. या प्रकारालाही आळा बसावा.

**- श्रीधर गोतरकर**


**तक्ता ४**

**(नियम ८ पाहा)**

**दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसानंतर प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकात प्रकाशित करावयाचे 'कर्मचारी टाइम्स' या वृत्तपत्राची मालकी व अन्य तपशीलाबाबतचे निवेदन.**

१. **प्रकाशनाचे स्थळ : 'कर्मचारी टाइम्स'**, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२.

२. **प्रकाशनाचे स्वरुप** : मासिक

३. **मुद्रकाचे नाव** : एम. एम. पठाण, राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ.

**भारतीय नागरिक आहेत काय?** : होय

**पत्ता** :९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२.

४. **प्रकाशकाचे नाव** : एम. एम. पठाण, राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ.

**भारतीय नागरिक आहेत काय?** : होय

**पत्ता** : ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२.

५. **संपादकाचे नाव** : एम. एम. पठाण, राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ.

**भारतीय नागरिक आहेत काय?** : होय

**पत्ता** :९, तळमजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२.

एकूण भरणा झालेल्या भागभांडवलापैकी एक टक्क्यापेक्षा अधिक भागभांडवल असलेल्यांची नावे व पत्ते : लागू नाही.

मी **एम. एम. पठाण**, द्वारा राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२. याद्वारे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे खरा आहे.

**एम. एम. पठाण**

दिनांक : १ मार्च २०२३ प्रकाशकाची स्वाक्षरी

द्वारा : राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ.

# राज्य वेतन सुधारणा समितीने केलेली शिफारस शासनाने मान्य करुन ज्या संवर्गांना सुधारित वेतन स्तर मंजूर केलेले आहेत अशा संवर्गाची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

## (वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३)

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | ७ व्या वेतन आयोगानुसार मंजूर सुधारित वेतनस्तर (रु.) | समितीने शिफारस केलेला ७व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनस्तर (रु.) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | (१) कृषि आयुक्तालय | | |
| १ | संचालक / | एस-२७:११८५००-२१४१०० | एस-२९:१३११००-२१६६०० |
| | (२) पशुसंवर्धन व आयुक्तालय | | |
| २ | पशुधन विकास अधिकारी | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| | २.सहकार, पणन व वस्त्रोद्योग | | |
| ३ | संचालक | एस-२५:७८८००-२०९२०० | एस-२६:८२२००-२११५०० |
| ४ | उप संचालक | एस-२०:५६१००-१७७५०० | एस-२१:५७१००-१८०८०० |
| ५ | सहाय्यक संचालक | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ६ | रेशीम विकास अधिकारी-श्रेणी१ | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ७ | रेशीम विकास अधिकारी-श्रेणी२ | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१५:४१८००-१३२३०० |
| ८ | ज्येष्ठ तांत्रिक सहाय्यक | एस-१०:२९२००-९२३०० | एस-११:३०१००-९५१०० |
| ९ | ज्येष्ठ क्षेत्र-प्रयोगशाळा सहाय्यक | एस-८:२५५००-८११०० | एस-९:२६४००-८३६०० |
| १० | प्रयोग निर्देशक | एस-७:२१७००-६९१०० | एस-८:२५५००-८११०० |
| ११ | क्षेत्र सहाय्यक | एस-६:१९९००-६३२०० | एस-७:२१७००-६९१०० |
| | ३.वित्त विभाग विक्रीकर विभाग | | |
| १२ | विक्रीकर अधिकारी | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| | ४.अन्न, नागरी पुरवठा,ग्राहक | | |
| | (१) नियंत्रक शिधावाटप | | |
| १३ | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| | (२) नागरी पुरवठा संचालनालय | | |
| १४ | सहाय्यक संचालक | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| | (३) पुरवठा आयुक्त | | |
| १५ | सहाय्यक संचालक | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| १६ | निरीक्षक अधिकारी | एस-१३:३५४००-११२४०० | एस-१४:३८६००-१२२८०० |
| | (४) नियंत्रक वैधमापनशास्त्र | | |
| १७ | सहाय्यक नियंत्रक, वैधमापन | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| १८ | निरीक्षक (कनिष्ठ) | एस-१३:३५४००-११२४०० | एस-१४: ३८६००-१२२८०० |
| १९ | क्षेत्र सहाय्यक | एस-६:१९९००-६३२०० | एस-७:२१७००-६९१०० |
| | (५) विभागीय जिल्हाधिकारी | | |
| २० | सहाय्यक जि.पुरवठा अधिकारी | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| | ५. सामान्य प्रशासन विभाग(१) राज्यपालांचे सचिवालय | | |
| २१ | सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक | एस-८:२५५००-८११०० | एस-९:२६४००-८३६०० |
| २२ | गृहपाल | एस-८:५५००-८११०० | एस-९:२६४००-८३६०० |
| २३ | खाद्यपेय सहाय्यक | एस-८:२५५००-८११०० | एस-९:२६४००-८३६०० |
| २४ | जलतरण तलाव प्रशिक्षक | एस-७:२१७००-६९१०० | एस-८:२५५००-८११०० |
| २५ | आचारी | एस-६:१९९००-६३२०० | एस-८:२५५००-८११०० |
| २६ | सहाय्यक आचारी | एस-५:१८०००-५६९०० | एस-७:२१७००-६९१०० |
| २७ | कनिष्ठ आचारी | एस-३:१६६००-५२४०० | एस-५:१८०००-५६९०० |
| २८ | पॅन्ट्रीमॅन | एस-३:१६६००-५२४०० | एस-५:१८०००-५६९०० |
| २९ | प्रमुख बटलर | एस-६:१९९००-६३२०० | एस-८:२५५००-८११०० |
| ३० | बटलर | एस-३:१६६००-५२४०० | एस-५:१८०००-५६९०० |
| ३१ | सहाय्यक (खाद्यपेय) | एस-१:१५०००-४७६०० | एस-३:१६६००-५२४०० |
| ३२ | मुख्यमाळी | एस-६:१९९००-६३२०० | एस-८:२५५००-८११०० |
| ३३ | माळी | एस-५:१८०००-५६९०० | एस-७:२१७००-६९१०० |
| | (२) सर्व प्रशासकीय विभाग | | |
| ३४ | वरिष्ठ स्वीय सहाय्यक | एस-२३:६७७००-२०८७०० | एस-२४:७११००-२११९०० |
| ३५ | लघुलेखक (निवडश्रेणी) | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ३६ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ३७ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१५:४१८००-१३२३०० |
| | (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग | | |
| ३८ | कक्ष अधिकारी | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ३९ | अवर सचिव | एस-१८:४९१००-१५५८०० | एस-२३:६७७००-२०८७०० |
| ४० | उपसचिव | एस-२३:६७७००-२०८७०० | एस-२५:७८८००-२०९२०० |
| ४१ | सहसचिव | एस-२५:७८८००-२०९२०० | एस-२७:११८५००-२१४१०० |
| | (४) माहिती व जनसंपर्क | | |
| ४२ | जिल्हा माहिती अधिकारी | एस-१८:४९१००-१५५८०० | एस-२०:५६१००-१७७५०० |
| ४३ | वरिष्ठ सहाय्यक संचालक | एस-१८:४९१००-१५५८०० | एस-२० : ५६१००-१७७५०० |
| ४४ | वरिष्ठ उप संपादक | एस-१८: ४९१००-१५५८०० | एस-२०:५६१००-१७७५०० |
| ४५ | चलत् छायाचित्रकार | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ४६ | दूरदर्शन छायाचित्रकार | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ४७ | सहाय्यक चित्रपट संकलक | एस-८:२५५००-८११०० | एस-१०:२९२००-९२३०० |
| ४८ | अंधार कोठडी परिचर | एस-१:१५०००-४७६०० | एस-३:१६६००-५२४०० |
| ४९ | प्रतिवेदक | एस-१०:२९२००-९२३०० | एस-१२:३२०००-१०१६०० |
| ५० | उर्दू अनुवादक/अनुवादक | एस-१०:२९२००-९२३०० | एस-१२ : ३२०००-१०१६०० |
| ५१ | सहाय्यक संचालक (माहिती)/ माहिती अधिकारी/अधीक्षक | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ५२ | सिने यंत्रचालक | एस-७:२१७००-६९१०० | एस-८:२५५००-८११०० |
| ५३ | छायाचित्रकार | एस-१०:२९२००-९२३०० | एस-१२:३२०००-१०१६०० |
| ५४ | उप संपादक | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ५५ | माहिती सहाय्यक | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| | ६. गृह विभाग | | |
| | (१) पोलीस महासंचालक | | |
| ५६ | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक | एस-७:२१७००-६९१०० | एस-८:२५५००-८११०० |
| ५७ | वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक | एस-८:२५५००-८११०० | एस-११:३०१००-९५१०० |
| ५८ | सहाय्यक छायाचित्रकार | एस-८:२५५००-८११०० | एस-११:३०१००-९५१०० |
| ५९ | छायाचित्रकार | एस-१०:२९२००-९२३०० | एस-१२:३२०००-१०१६०० |
| ६० | कार्यदेशक छायाचित्रकार | एस-१०:२९२००-९२३०० | एस-१३:३५४००-११२४०० |
| ६१ | सहाय्यक दस्तऐवज परिक्षक | एस-१३:३५४००-११२४०० | एस-१५ : ४१८००-१३२३०० |
| ६२ | शासकीय दस्तऐवज परिक्षक | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१८:४९१००-१५५८०० |
| ६३ | अपर मुख्य दस्तऐवज परिक्षक | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-२०:५६१००-१७७५०० |
| ६४ | मुख्य दस्तऐवज परिक्षक | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-२२:६००००-१९०८०० |
| ६५ | महासंचालक विधि सल्लागार | एस-२३:६७७००-२०८७०० | एस-२७:११८५००-२१४१०० |
| ६६ | विधि अधिकारी | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-१८:४९१००-१५५८०० |
| | (२) आयुक्त, उत्पादन शुल्क | | |
| ६७ | जवान | एस-६:१९९००-६३२०० | एस-७:२१७००-६९१०० |
| ६८ | जवान-नि-वाहनचालक | एस-६:१९९००-६३२०० | एस-७:२१७००-६९१०० |
| ६९ | सहायक दुय्यम निरिक्षक | एस-७:२१७००-६९१०० | एस-८:२५५००-८११०० |
| ७० | निरीक्षक | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१५:४१८००-१३२३०० |
| ७१ | सहाय्यक आयुक्त | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| | ७. उद्योग, ऊर्जा व कामगार मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय | | |
| ७२ | सुतार (वरिष्ठ) | एस-६:१९९००-६३२०० | एस-८:२५५००-८११०० |
| ७३ | सुतार | एस-५:१८०००-५६९०० | एस-७:२१७००-६९१०० |
| | ८.वैद्यकीय शिक्षण,औषधी द्रव्ये वैद्यकीय शिक्षण संचालनालय | | |
| ७४ | अधिसेविका मधील पृष्ठ क्र. १९०) | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-१८:४९१००-१५५८०० |
| ७५ | अधिसेविका मधील पृष्ठ क्र. १९१) | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ७६ | सहाय्यक अधिसेविका | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ७७ | सार्वजनिक आरोग्य परिचारिका | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ७८ | मानसोपचार परिचारीका | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ७९ | बालरोग परिचारिका | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ८० | सहाय्यकारी परिचारिका प्रसाविका | एस-८:२५५००-८११०० | एस-९:२६४००-८३६०० |
| | ९. नियोजन विभाग अर्थ व सांख्यिकी संचालनालय | | |
| ८१ | अतिरिक्त संचालक | एस-२५:७८८००-२०९२०० | एस-२७:११८५००-२१४१०० |
| ८२ | सह संचालक | एस-२३:६७७००-२०८७०० | एस-२५:७८८००-२०९२०० |
| ८३ | उप संचालक (निवडश्रेणी) | एस-२०:५६१००-१७७५०० | एस-२३:६७७००-२०८७०० |
| ८४ | संशोधन अधिकारी | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ८५ | अन्वेषक | एस-७:२१७००-६९१०० | एस-८:२५५००-८११०० |
| | नियोजन विभाग (खुद्द) | | |
| ८६ | ग्रंथपाल व संदर्भअधिकारी | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-२०:५६१००-१७७५०० |
| | १०.सार्वजनिक आरोग्य विभाग आरोग्य सेवा संचालनालय | | |
| ८७ | शल्यचिकीत्सक | एस-२३:६७७००-२०८७०० | एस-२४:७११००-२११९०० |
| ८८ | जिल्हा आरोग्य अधिकारी | एस-२३:६७७००-२०८७०० | एस-२४:७११००-२११९०० |
| ८९ | सहाय्यक अधिसेविका | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१७:४७६००-१५११०० |
| ९० | आरोग्य कार्यकर्ता /बहूउद्देशीय आरोग्य कार्यकर्ता | एस-८:२५५००-८११०० | एस-९:२६४००-८३६०० |
| ९१ | अधिसेविका | एस-१६:४४९००-१४२४०० | एस-१८:४९१००-१५५८०० |
| ९२ | मानसोपचार परिचारिका | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ९३ | सार्वजनिक आरोग्य परिचारिका | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| | ११, १२, १३. सार्वजनिक बांधकाम विभाग/जलसंपदा / मृद व जलसंधारण विभाग | | |
| ९४ | सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ९५ | शाखा अभियंता | एस-१५:४१८००-१३२३०० | एस-१६:४४९००-१४२४०० |
| ९६ | कनिष्ठ अभियंता | एस-१४:३८६००-१२२८०० | एस-१५:४१८००-१३२३०० |
| | १४. महसूल व वन विभाग | | |
| ९७ | वनपाल | एस-८:२५५००-८११०० | एस-९:२६४००-८३६०० |
| ९८ | वनरक्षक | एस-५:१८०००-५६९०० | एस-७:२१७००-६९१०० |
| | १५. ग्राम विकास विभाग | | |
| ९९ | विस्तार अधिकारी | एस-१३:३५४००-११२४०० | एस-१४:३८६००-१२२८०० |
| | १६.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | | |
| १०० | तबलजी | एस-६:१९९००-६३२०० | एस-८ : २५५००-८११०० |
| | १७. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष | | |
| १०१ | विशेष जिल्हा समाजकल्याण | एस-१८:४९१००-१५५८०० | एस-२०:५६१००-१७७५०० |
| | १८. आदिवासी विकास विभाग | | |
| १०२ | अधीक्षक(पुरुष)(शासकीय व अनुदानित आश्रमशाळा) | एस-८:२५५००-८११०० | एस-१२:३२०००-१०१६०० |
| १०३ | अधीक्षक(महिला)शासकीय व अनुदानित आश्रमशाळा) | एस-८:२५५००-८११०० | एस-१२:३२०००-१०१६०० |
| | १९. नगर विकास विभाग | | |
| १०४ | मुख्याधिकारी श्रेणी १- (संवर्गातील पदांना) | एस-२०:५६१००-१७७५०० | एस-२३:६७७००-२०८७०० |
| | २०. विधानमंडळ सचिवालय | | |
| १०५ | मुख्य टंकलेखक | एस-६:१९९००-६३२०० | एस-८:२५५००-८११०० |

# ८ व्या वेतन आयोगात होऊ शकते ४४ टक्क्यांहून अधिक पगारवाढ

**नवी दिल्ली :** केंद्र सरकार दर दहा वर्षांनी सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेत सुधारणा करण्यासाठी वेतन आयोग स्थापन करते. वेतन आयोगाचा विचार प्रामुख्याने केंद्र सरकारची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर असतो. १९४७ पासून किमान सात वेतन आयोग स्थापन करण्यात आले आहेत. पहिला आयोग जानेवारी १९४६ रोजी स्थापन करण्यात आला होता. तर सर्वात अलीकडील ७ वा वेतन आयोग २८ फेब्रुवारी २०१४ रोजी स्थापन करण्यात आला होता.

दरम्यान, केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारक ८ व्या वेतन आयोगाची आतुरतेने वाट पाहत आहेत. २०२४ मध्ये ८ वा वेतन आयोग लागू केला जाऊ शकतो. नवीन, प्रगत वेतन आयोगाची स्थापना झाल्यास त्याचा सरकारी कर्मचाऱ्यांना फायदा होऊ शकतो. त्यांच्या पगारात मोठी वाढ होऊ शकते. मात्र, सध्यातरी ८ वा वेतन आयोग स्थापन करण्याबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे केंद्राने म्हंटले आहे.

वृत्तानुसार, केंद्रीय कर्मचारी संघटनांचे म्हणणे आहे की, सध्या किमान वेतन मर्यादा १८ हजार रुपये ठेवण्यात आली आहे. यामध्ये फिटमेंट फॅक्टरला इन्क्रीमेंटमध्ये खूप महत्त्व देण्यात आले आहे. सध्या, हा घटक २.५७% आहे. ७ व्या वेतन आयोगामध्ये, तो ३.६८% पर्यंत ठेवण्याच्या शिफारसी करण्यात आली होती. असे झाल्यास कर्मचाऱ्यांचे किमान वेतन १८ हजार रुपयांवरून २६ हजार रुपयांपर्यंत वाढेल.

काही सूत्रांचे म्हणणे आहे की, सरकार कदाचित दुसरा वेतन आयोग लागू करणार नाही. त्याऐवजी, केंद्र नवीन प्रणाली स्थापित करू शकते. या प्रणालीमध्ये, डीए ५० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास पगारात स्वयंचलित सुधारणा होऊ शकते. मात्र, सरकारने याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही.

सातवा वेतन आयोग हा जानेवारी २०१६ पासून लागू झाला होता. दर दहा वर्षांनी वेतनाची पुनर्रचना केली जात असल्याने जानेवारी २०२६ पासून आठवा वेतन आयोग लागू झालाच पाहिजे, अशी विविध केंद्रीय सरकारी कर्मचारी संघटनांची मागणी आहे. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना नवा वेतन आयोग लागू झाल्यावर विविध राज्यांमध्ये असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांकडून त्याच धर्तीवर वेतनाची मागणी केली जाते. यामुळेच वेतन आयोग हा संपूर्ण देशभरच्या कर्मचाऱ्यांसाठी संवेदनशील मुद्दा असतो. केंद्र सरकारमध्ये सुमारे ४० लाख पदे मंजूर असून त्यापैकी ३१ लाख कर्मचारी सेवेत आहेत. म्हणजेच २० टक्क्यांच्या आसपास पदे रिक्त असल्याची माहिती सरकारच्या वतीने संसदेत देण्यात आली होती. केंद्रीय कर्मचाऱ्यांपैकी ९२ टक्के कर्मचारी हे रेल्वे, गृह, संरक्षण, टपाल आणि महसूल या पाच विभागांत आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना दुखावणे कोणत्याच सरकारला शक्य नसते. आठवा वेतन आयोग लागू करण्याचा प्रस्ताव नाही या उत्तरावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्यावर अद्याप काहीच निर्णय झालेला नाही, अशी सारवासारव सरकारी सूत्रांना करावी लागली. नवीन वेतन आयोगाची अंमलबजावणी ही २०२६च्या सुरुवातीला होईल. नव्या वेतन आयोगाची दोन वर्षे आधी नियुक्ती केली जाते याकडे लक्ष वेधण्यात आले. याचाच अर्थ २०२४च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी आठवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा करून केंद्रीय कर्मचाऱ्यांना खूश केले जाऊ शकते. वेतन आयोगामुळे केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे भले होत असले तरी सहाव्या व सातव्या आयोग अहवालांमुळे राज्य सरकारांचे आर्थिक कंबरडेच पार मोडले.

वेतन आयोग अहवालानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतन, भत्त्यांत घसघशीत वाढ होत असली तरी वेतनावरील खर्च वाढल्याने देशातील काही राज्ये अक्षरशः कंगाल झाली. विकासकामे वा कल्याणकारी योजनांकरिता राज्यांकडे निधीच शिल्लक राहात नाही. राज्यांच्या महसुली उत्पन्नात वाढ होत नसताना दुसरीकडे कर्जाचा बोजा वाढत आहे. वीज देयकांची थकबाकी ही एक मोठी समस्या. या साऱ्यांची कसरत करताना कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चात वाढ अशा दुष्टचक्रातून राज्यांना मार्गक्रमण करावे लागते. सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात जरूर वाढ झाली पाहिजे, पण त्याचबरोबर सरकारी यंत्रणा स्वयंपूर्ण होतील या दृष्टीने केंद्राला पावले उचलावी लागतील.

# जुन्या निवृत्ती वेतन योजनेचे त्रांगडे

आपल्या देशात कार्यरत सरकारी कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने व भारतीय राज्यघटनेत असलेल्या तरतूदीनुसार १९८२ पासून जुने पारिभाषिक निवृत्तीवेतन म्हणजेच पेन्शन योजना लागू झाली. कर्मचाऱ्यांनी आपल्या आयुष्यातील ३० ते ३५ वर्षे शासनाच्या इमानेइतबारे केलेल्या सेवेची नोंद घेऊन त्यांच्या म्हातारपणासाठी भरपाई म्हणून ही जुनी पेन्शन योजना दिली जात होती. मात्र आता ही योजना हिरावून १ नोव्हेंबर २००५ पासून नवीन पेन्शन योजना सुरु करण्यात आली. जुनी योजना लोकसभा आणि राज्यसभेच्या सभागृहांत पीएफआरडीए कायद्याखाली मंजूर करण्यात आली होती. ज्यांच्या मतदानाने हा कायदा मंजूर झाला, त्यांना ही योजना आजही लागू आहे. पण शासकीय कर्मचाऱ्यांना मात्र जुनी

**मारुती शिंदे**
अध्यक्ष : राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना (पुणे जिल्हा)
मो.नं. ९९२१६९०७७९

पेन्शन योजना मिळत नाही. लोकप्रतिनिधी, खासदार, आमदार, न्यायालय, संरक्षण दल यांना जुनी पेन्शन योजना तसेच कॅशलेश आरोग्य सुविधा दिल्या जातात. सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर प्रचंड खर्च होतो, अशी प्रसिद्धी देऊन लोकप्रतिनिधी आपला खर्च लपवतात.

राज्यात तब्बल ४० टक्के पदे रिक्त आहेत. हा खर्च सरकारकडून वाचवला जातो. १९८१ च्या वेळची लोकसंख्या आता तीनपट वाढली आहे. मात्र कर्मचारी निम्म्याहून कमी झाले आहेत. सातव्या वेतन आयोगात जेमतेम आठ ते नऊ हजार रुपये इतकीच वाढ झाली आहे. लोकप्रतिनिधींचे पगार दोन्ही सभागृहांत एकमताने मंजूर होतात. मात्र कर्मचाऱ्यांना न्याय्य हक्कासाठी मोर्चे, आंदोलने, संप यासारखी आयुधे वापरावी लागतात. नंतरच वेतनवाढ होते. सरकारी नोकरीत जनतेची सेवा आहे, वेळेचे बंधन असते. महत्वाचे म्हणजे सामाजिक बांधिलकी असते.

महाराष्टात नवीन राष्ट्रीय पेन्शन योजनेत नोव्हेंबर २००५ पासून कर्मचाऱ्यांच्या वेतनातून १० टक्के आणि शासनाचे १० टक्के अशी कपात होत होती. आता ही वाढ १४ टक्के झाली आहे. जमा झालेली रक्कम केंद्राकडे फंड मॅनेजर यांच्याकडे जमा होते. २४ टक्के रक्कम झाल्यानंतर भविष्य निर्वाह निधीची तरतूद रद्द करण्यात आली आहे. या योजनेतील कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर तुटपुंजी पेन्शन, ग्रॅज्युईटी घेऊन खडतर जीवन जगावे लागणार आहे. हा कायदा रद्द व्हावा, यासाठी बहुतांश राज्यांमध्ये उठाव झाला. आता राजस्थान, पंजाब, झारखंड, छतीसगड, हिमाचल प्रदेश या राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. महाराष्ट्रात पेन्शनचा प्रश्न मार्गी लावेल, असा विश्वासही वाटतो. मात्र, याचा विचार झाला नाही, तर तीव्र संघर्ष अटळ असेल.

# निवृत्ती वेतन मेहरबानी नसून मुलभूत हक्क आहे

**पान १ वरुन...**


अनिश्चितता दूर करण्या-साठी पुरोगामी महाराष्ट्र शासनाने देखील १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांना विद्यमान नवीन पेन्शन योजना रद्द करून पूर्वलक्षी प्रभावाने जुनी पेन्शन योजना तातडीने लागू करावी, अशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची तळमळीची रास्त मागणी आहे.

काही राज्य शासनांमध्येही या कर्मचारी जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत चर्चाविनिमय सुरु असल्याचे समजते. साधारणपणे त्या त्या राज्यातील निवडणूका जवळ येतील, त्यावेळी याबाबतचे निर्णय होऊ शकतात. यासंदर्भात महत्वाची बाब विचारात घेतल्यास असे दिसून येते की, सर्व राज्यांत प्रशासकीय व राजकीय विचारधारा भिन्न असल्यामुळे सर्व राज्यांसाठी समन्वयाने याबाबतचे निर्णय होणे कठीण आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन केंद्र शासनानेच या महत्वाच्या विषयावर पूर्वलक्षी प्रभावाने जुनी पेन्शन योजना लागू करून केंद्र व देशातील सर्व राज्यातील अधिकारी तसेच कर्मचारी यांना मोठा दिलासा देण्यामध्ये विशेष लक्ष देणेही गरजेचे आहे.

जागतिक पातळीवर या-संबंधीची चर्चा विचारात घेता, कर्मचारी वर्गाची काळजी पूर्ण आयुष्यभरासाठी बसण्यापेक्षा, ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविणे अधिक सोयीचे आहे, असा मानस दिसून येतो.

ही विचारसरणी मतलबी व एककल्ली असल्याचे दिसते. वास्तविक ज्या घटकांकडून सुमारे ३० वर्षांपेक्षा अधिक काळासाठी शासनसेवा करून घेतली जाते. त्यांच्या भविष्याबद्दल विचार करून कर्तव्यभावनेने निर्णय घेणे न्यायोचित होईल.

जुनी पेन्शन योजना २००४ किंवा २००५ पासून लागू केल्यास फार मोठ्या खर्चाचा बोजा राज्यांवर किंवा केंद्रावर येईल, ही धारणा फारशी बरोबर वाटत नाही. कारण या नवीन योजनेनुसार कर्मचारी वर्गाच्या पगारातील १० टक्के व शासनाचा १४ टक्के सहभाग मिळून आवश्यकता असणारी मोठी रक्कम केंद्र व राज्य शासनाकडे निश्चितच उपलब्ध आहे. सेवा कालावधीमध्ये कामकाजात लक्ष देतानाच, भविष्याची चिंता ग्रासणे योग्य होत नाही. सेवानिवृत्तीनंतर ६० टक्के इतकी मोठी रक्कम एकदम खर्च होण्याची शक्यता आहे तसेच ४० टक्के ची शासकीय रोख्यांत गुंतवणूक करणे सक्तीचे होत आहे. यामध्ये उत्पन्नाची शाश्वतीही नाही.

प्रथम
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
अद्विक


बाळा तुला उदंड आयुष्य लाभो हिच सदिच्छा.
श्री. व सौ. वैदिका
विजय कोंडवसकर

# तलाठी व मंडळ अधिकारी यांनी सुरक्षित राहून जनतेची सेवा करावी : जयपाल पाटील

कर्जत : तलाठी म्हणजे शेतकरी, नागरिक यांच्यासाठी महसूल खात्याचा महत्वाचा दुवा त्यांना डोंगरदऱ्या, ऊन, पावसात जावे लागते. त्यामुळे प्रत्येकाने आपली सुरक्षा कायम राखून आपली घराकडे कोणीतरी वाट पाहत आहे यासाठी आपली वाहने कायम सुरक्षित चालवावीत असे मार्गदर्शन तहसील कार्यालयाने तलाठी मंडळ अधिकारी व कोतवाल यांच्यासाठी आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत रायगड भूषण जयपाल पाटील यांनी केले.

प्रांताधिकारी अजित नैराळे यांच्या आदेशाने तहसीलदार कर्जत डॉक्टर शितल रसाळ यांनी पंचायत समिती कार्यालय सभागृहात कार्यशाळेत नायब तहसीलदार तथा आपत्ती व्यवस्थापन प्रमुख सचिन राऊत, रायगड भूषण जयपाल पाटील. नायब तहसीलदार सोपान बाचकर प्रशिक्षणार्थी नायब तहसीलदार अमरसिंह जाधव, योगा शिक्षिका दीपा घेवारे. एडवोकेट गोपाळ शेळके उपस्थित होते.

प्रारंभी पाहुण्याचे पुष्पगुच्छ देऊन नायब तहसीलदार सचिन राऊत यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात सांगितले की, आपले कोकण आयुक्त महेंद्र कल्याणकर यांनी जिल्हातील शासकीय कर्मचारी यांनी आपत्ती विषयी मार्गदर्शन असणे. गरजेचे असल्याने आपत्ती व्यवस्थापन तज्ञ व जिल्हाधिकारी रायगड आपत्ती प्राधिकरण सदस्य जयपाल पाटील यांचे ज्ञान आपण सर्वांसाठी जनतेसाठी व आपल्या कुटुंबासाठी उपयुक्त आहे. ते आज आपण घेऊया. प्रारंभी योगशिक्षिका दीपा घेवारे यांनी आपले सर्वांचे जीवन कायम धावपळीचे असते. खुर्चीत अनेक तास बसणे आणि जनतेबरोबर काय कामाचा त्रास व ताण निर्माण होत असतो, यासाठी आपल्या देशात अनेक काळापासून सुरू असलेले योग प्रत्येकाने आपल्या शरीराच्या व मनाच्या सुरक्षेसाठी करणे गरजेचे आहे. असे सांगून योगाचे साधे सोपे ५ आसनांची प्रात्यक्षिके दाखविली. तलाठी व महिलांवरील अन्यायाबाबत हुंडाबळी, मानसिक त्रास सरकारी कार्यालयातील त्रास यासारख्या कुटुंबातील इतरांच्या त्रासाबाबत सुरक्षेसाठी कायद्यांच्या कलमांची माहिती देऊन सूचना दिल्या. यानंतर जयपाल पाटील यांनी ११२ क्रमांकाचा वापराबद्दल प्रात्यक्षिक देताना फोन करताच बीट अंमलदार उपस्थित राहिले.



जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यात यावेत, या मागणीसाठी करावयाच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय संवर्ग व घटक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्वाची बैठक औरंगाबाद येथे आयोजित केली गेली. यात डॉ. देविदास जरारे, वैजिनाथ विद्योतेकर, एन. एस. कांबळे तसेच पदाधिकारी यांचाही सहभाग होता.

## कर्मचारी टाइम्सचे क्रांतिकारक पाऊल

मुंबई : आजच्या तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात काळाची गरज ओळखत 'कर्मचारी टाइम्स'ने क्यूआर कोडच्या माध्यमातून जगभरातील वाचकांसाठी वृत्तपत्र उपलब्ध करून दिले आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचे नेते आणि वृत्तपत्राचे संपादक भाऊसाहेब पठाण यांच्या संकल्पनेतून हे साकार होत आहे. आता क्यूआर कोड स्कॅन करा, अंक वाचा आणि देश-विदेशात वाचकांपर्यंत पोहचवा.

# अनुसूचित क्षेत्रातील शासकीय पदे आदिवासींमधूनच भरण्याचा निर्णय

मुंबई : राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील अधिसूचित करण्यात आलेली १७ संवर्गातील पदे आदिवासींमधूनच भरण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

या पदांमध्ये तलाठी, सर्वेक्षक, ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षक, शिक्षक, आदिवासी विकास निरीक्षक, कृषी सहायक, पशुधन पर्यवेक्षक, साहाय्यकारी परिचारिका व प्रसाविका, बहुउद्देशीय, आरोग्यसेवक, वनरक्षक, कोतवाल, वन-अन्वेषक, प्रयोगशाळा परिचर, कामाठी, पोलीस पाटील यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे आदिवासी युवक, युवतींना स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे, असे राज्या शासनाने म्हटले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनुसूचित क्षेत्रातील पदे आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात भरण्याचे ठरविण्यात आले व ज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ज्या गावांमध्ये आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे, अशा सर्व गावांमध्ये १७ संवर्गातील सरळसेवेची १०० टक्के पदे स्थानिक आदिवासींमधून भरण्याचा निर्णय घेण्यात आला.

ज्या गावात आदिवासींची लोकसंख्येच्या प्रमाणात भरण्याचे ठरविण्यात आले. राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ज्या गावांमध्ये आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे, अशा सर्व गावांमध्ये १७ संवर्गातील सरळसेवेची १०० टक्के पदे स्थानिक आदिवासींमधून भरण्याचा निर्णय घेण्यात आला.

ज्या गावात आदिवासींची लोकसंख्या २५ ते ५० टक्क्यांदरम्यान आहे, अशा सर्व गावांमध्ये अधिसूचित संवर्गातील ५० टक्के पदे स्थानिक आदिवासींमधून भरण्यात येतील. त्याचबरोबर गावांची आदिवासींची लोकसंख्या २५ टक्यांपेक्षा कमी आहे, अशा गावांमध्ये (कोतवाल व पोलीस पाटील वगळून) २५ टक्के इतकी पदे ही स्थानिक आदिवासींमधून भरण्यात येणार आहेत. तसेच या गावांमध्ये कोतवाल व पोलीस पाटील संवर्गातील पदे आरक्षणाच्या नियमानुसार तसेच गुणवत्तेनुसार भरली जातील.

# सहकारच्या पदोन्नत्या रखडल्यामुळे नाराजी

पुणे : मुंबई, पुणे आणि नागपूर या मोठ्या उलाढालीच्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर सहकार विभागातील अपर निबंधक दर्जाचा अधिकारी प्रतिनियुक्तीने सचिवपदी नियुक्ती करता येते. सध्या पुणे बाजार समितीवर सहकार उपनिबंधक याच्या प्रशासकपदी कार्यरत असून, त्यांच्या बदलीच्या हालचाली सुरू झाल्याचे समजते. राज्यातील सत्तांतरानंतर भाजपने याबाबत पावले उचलल्याचे सांगण्यात येते. त्या दृष्टीने सहकार अपर निबंधक नाही, तर काही उपनिबंधकांची नावे मंत्रालय स्तरावर चर्चेत असून, काहींनी सचिव व प्रशासक पदासीठी 'फिल्डींग' लावल्याचे सहकार आयक्तालयातील सूत्रांकडून सांगण्यात आले.

सहकार आयुक्तालयांतर्गत कार्यरत विभागीय सहनिबंधक, अपर निबंधक, अपर आयुक्त या पदांच्या पदोन्नत्या रखडल्याने अधिकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. दुसरीकडे अतिरिक्त पदभाराने सहकार आयुक्त अधिकाऱ्यांवरही कामाचा ताण येत असताना सहकार विभाग मंत्रालयात असलेल्या पदोन्नतीच्या फायलींवरील धूळ कधी हटणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सहकार खात्यात अपर आयुक्त व इतर दोन पदे गेली काही महिने रिक्तच आहेत. अतिरिक्त पदभार देऊन हे काम सुरू ठेवण्याची परंपरा मात्र सहकारमंत्री अतुल सावे कधी खंडित करणार? असा प्रश्न विचारला जात आहे.

सहकार आयुक्तालयात अपर आयुक्त व विशेष निबंधकाचे एक पद आणि दुसरे राज्याचे पणन संचालक या पदाचा समावेश आहे. पणन संचालकपदी पूर्णवेळ अधिकारी नसून काम सुरू आहे.

## स्वच्छ भारत अभियानांतर्गत फलटण कर्मचाऱ्यांना गणवेश

फलटण : स्वच्छ भारत अभियान राबविताना संपूर्ण देशातील सफाई कामगारांना एकसारखा परंतु सुरक्षित पोशाख असला पाहिजे, ही संकल्पना घेऊन केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान अतिरिक्त संचालक नवीनकुमार अग्रवाल यांच्या माध्यमातून सुचविलेल्या पोषाखाचे वितरण महाराष्ट्रात सर्वप्रथम फलटण नगरपरिषदेने केल्याचे निदर्शनास आणून देत कामगारांना सर्व सुविधा आणि वेतन व वेतनेतर सर्व देणी देण्यातही नगरपरिषद सर्वात पुढे असल्याचे नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी संजय गायकवाड यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

केंद्र शासनाचा सूचना विचारात घेऊन नगरपरिषद सफाई कामगारांना उत्तम प्रकारचे २ ड्रेस, गमबूट, डोक्याला टोपी, महिला कर्मचारी वर्गास साडी अशा उत्तम कपड्यांचे वाटप नगरपरिषदेत करण्यात आले.

# पदनाम घोटाळ्यात सहा विद्यापीठांना दणका

(आदित्य शिंदे)

मुंबई : शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविण्याच्या पदनाम घोटाळ्याप्रकरणी वेतन वसुली आणि फेरवेतन करण्याबाबत राज्य सरकारचा शासन निर्णय उच्च न्यायालयाने योग्य ठरवला. तसेच, पदनाम घोटाळ्याद्वारे वेतनवाढ झालेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून वेतनाची अतिरिक्त वसूल करा, असे आदेश खंडपीठाने दिले.

न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठासह सहा विद्यापीठांना चांगलाच दणका बसला आहे.

मुख्य न्यायाधीश संजय गंगापूरवाला आणि न्यायाधीस आर.एन.लड्डा यांच्या खंडपीठाने निर्णय जाहीर करताना राज्य सरकारचा शासन निर्णय योग्य ठरवला. या शासन निर्णयाने आधीचे वेतन निश्चितीचे निर्णय रद्द करण्यात आले होते. न्यायालयाने शासन निर्णयाला दिलेली स्थगिती हटवली. पदनाम घोटाळ्याच्या लाभार्थी १६६२ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून अतिरिक्त वेतनाची वसुली करण्याचे आदेश सरकारला दिले. हा घोटाळा झाल्यामुळे राज्य सरकारला कोट्यावधीच्या नुकसानाला सामोरे जावे लागले होते. या निर्णयामुळे नुकसानाला ब्रेक लागला आहे.

घोटाळ्याप्रकरणी यशवंत कुलकर्णी यांनी जनहित याचिका केली. त्यामुळे दहा विद्यापीठांना धडा मिळाल्याचे बोलले जात आहे. मात्र विद्यापीठासारख्या क्षेत्रात अशी वेळ यावी, याबद्दल खेद व्यक्त होत आहे. विद्यापीठ प्रशासनाने संभाव्य घटना टाळता येतील, अशा उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही मत व्यक्त होत आहे.

## शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विमा वितरण

मुंबई : २०२२मध्ये महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या पिकाचे खूप नुकसान झाले होते. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी खरीपासाठी पीक विमा काढला होता. अश्या शेतकऱ्यांच्या मागणी नंतर पीक विमा वितरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. शेतकऱ्यांनी २०२२मध्ये झालेल्या पावसामुळे आणि अतिवृष्टीमुळे पीक विमा कंपन्यांकडे नुकसान भरपाई मागणी केली होती. यानंतर पीक विमा कंपन्यांना राज्य शासनाने पीक विमा वितरित करण्याचे आदेश दिले होते. ५० टक्क्यांहून अधिक नुकसान ज्या जिल्ह्यांमध्ये झाले आहे, तेथे अनेक शेतकऱ्यांना २५ टक्के पीक विमा आगाऊ वाटण्यात आला आहे. अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर पहिल्या टप्प्यातील पीक विम्याची रक्कम जमा करण्यात आली आहे. बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची देयके ऑफलाईन पद्धतीने लवकरच

मुंबई : राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः अनुदानित व पुर्णतः अनुदानित शाळेतील व अध्यापक विद्यालयातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियमित वेतनाव्यतिरिक्त इतर देयके ऑफलाईन पद्धतीने वितरीत करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून अत्यंत महत्वपूर्ण शासन निर्णय ०१.०२.२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

राज्यातील खाजगी व पूर्णतः अनुदानित शाळेतील व अध्यापक विद्यालयातील कार्यरत सेवानिवृत्त शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियमित वेतनाव्यतिरिक्त इतर थकित देयके, वैद्यकीय देयके, सुधारित वेतन/संरचना लागू केल्यानंतर देय असणारा वेतनातील फरक, महागाई भत्ता वाढ इ. ऑफलाईन पद्धतीने अदा करण्यास मार्च २०२३ अखेरपर्यंत मान्यता देण्यात येत आहे.

यामध्ये राज्यातील मान्यता प्राप्त अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी किंवा राष्ट्रीय निवृत्ती वेतन अथवा परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू नसल्याने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनाची थकबाकी एकरकमी अदा करण्याबाबत दि.१७.०२.२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यानुसार थकबाकीची रक्कम अदा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तांत्रिक कारणांमुळे सातव्या वेतन आयोगाचे थकबाकीचे हप्ते अदा करता आलेले नाहीत. अशांना सदर देयके अदा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# पद आणि पदाचे महत्व

कोणत्याही क्षेत्रातील पद म्हणजे सहकाऱ्यानी त्या क्षेत्रात समूह हितासाठी उपलब्ध करून दिलेली संधी व काटेरी मुकुट असतो. कोणत्याही माणसाचे महत्व हे पद मिळाल्यामुळे कधीच वाढत नाही, तर त्या पदाला तो किती न्याय देतो, तो किती कार्यक्षम, कर्तृत्व, नेतृत्व दाखवतो, यावरच त्याचे खरे व्यक्तिमत्व समाजाला समजते.

कर्तृत्वच नसेल आणि तरीही पद मिळाल्यामुळे अहंपणा, स्वार्थपणा, लबाडी व गर्व चढला असेल तर कालांतराने निश्चित त्याचा गर्व खाली होतो. पदामुळे तात्पुरते महत्व वाढते, पण कर्तृत्वामुळे आयुष्यभर महत्व राहते. आपल्याला मिळालेल्या पदामुळे आपल्यावर असलेली जबाबदारी व्यवस्थित वेळ देऊन पार पाडली पाहिजे. चांगली माणसे, सहकारी बरोबर घेऊन त्या क्षेत्रात यश मिळवले पाहिजे. ज्यांनी तुमच्यासाठी त्याग केला आहे, त्यांची जाणीव निरंतर व कायमच ठेवली पाहिजे. व्यक्ति जेव्हा समाजात जितक्या उंचीवर पोहचते ती निव्वळ त्याच्या कर्तृत्वामुळे नव्हे, तर त्या व्यक्तीच्या सोबत असलेल्या अनेक लोकांनी केलेला त्यागाचा सुद्धा त्यात महत्वाचा वाटा असतो. म्हणून संबंधितांनी आपल्या स्वतःला मोठे म्हणण्यापेक्षा आपल्याला मोठे करणारी आपली माणसं मोठी असतात, याची जाणीव ठेवून वागलेले बरं. ज्या पायरीचा सहारा घेऊन आपण पुढची पायरी गाठली आहे, त्या पायरीला कधीच विसरू नये. कारण त्या पायरीचा आधार घेतला नसता तर आपण पुढची पायरी कधीच ओलांडून शकलो नसतो.

**भाऊसाहेब पठाण**
उपाध्यक्ष-दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप. क्रेडिट सोसायटी

लक्षात असू द्या, पद क्षणभंगुर असते, पण पद गेल्यावरही आपली किंमत कायम राहिली पाहिजे, असे माणसांशी वागले पाहिजे. नाहीतर हाच समाज तुमची कार्यक्षमता, कर्तृत्व, वागणं, प्रामाणिकता व बोलणं पाहत असतो, ऐकत असतो आणि सहनही करत असतो. मात्र लबाडीपणा वाढला तर योग्य वेळी धडा शिकवतो. तिथं तुमची किंमत रसातळाला जावून शून्य होऊ शकते.

म्हणून आपल्या माणसांशी, समाजाशी व विश्वासू मित्रांशी नीट वागा, नीट बोला व आपले कर्तृत्व निस्वार्थी व चांगले आहे, हे सिद्ध करा, तरच लोक तुमच्या सोबत राहतील. जो दुसऱ्यांना मान देतो, मुळात तोच स्वत सन्माननीय असतो. कारण माणूस दुसऱ्यांना तेच देऊ शकतो, जे त्याच्या जवळ असते. मनाचा मोठेपणा हा गुण आहे. जो पदाने नव्हे तर संस्कारांनी प्राप्त होतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीने पद आहे म्हणूनच काम केले पाहिजे, असे नाही. पद हे आपण मागून नाहीतर आपल्या लोकांनी, समाजाने दिले पाहिजे तरच त्या कर्तृत्वाला मानसन्मान मिळतो. पद म्हणजे मी कुणी मोठा आहे हे ज्या दिवशी मनात येईल त्या दिवसापासून आपली उतरती कळा सुरु झाली हे समजून घ्या. यामुळे पदाचा गर्व टाळून पदाला न्याय मिळेल, असेच काम करा.

आपल्याला शिकवण दिली जाते की, कुठल्याही गोष्टीचा गर्व करू नये, अहंकार बाळगू नये. हे आपल्यावर लहान वयात झालेले संस्कार अशावेळी उपयोगात येतात. माणसं जोडली जातात. हीच माणसे नंतर पदावर असलेल्यांना सांभाळून घेतात, हेही तितकेच खरे.

## आवाहन

'कर्मचारी टाइम्स' मध्ये सर्व संवर्गातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संबंधीची माहिती, बातम्या तसेच घडामोडी यांची माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बातम्या, घडामोडी, लेख प्रसिद्धीसाठी पाठवावेत. जाहिरातीसाठी देखील आवाहन करण्यात येत आहे. **संपर्क संपादक : 'कर्मचारी टाइम्स', द्वारा राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, तळ मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२. भ्रमणध्वनी: ९८९०९१६५८८ ईमेल:** karmacharitimes @gmail.com

♦♦♦

'कर्मचारी टाइम्स'चे कार्यालयीन प्रतिनिधी
१. भाऊसाहेब पठाण
२. अशोक शिंदे
३. छाया करे
४. रिध्दी कुबल
५. गुरुदत्त वाकदेकर

शिरपूर : रोजगार हमी योजने अंतर्गत सरकारने प्रत्येक जिल्हात मनुष्य दिनाचे उदिद्ष्ट दिले आहे. त्यानुसार शिरपूर तालुक्यात तीन लाख मनुष्य दिनाचे उद्दिष्ट दिले गेले आहे. त्यामुळे साहजिकच कामांची संख्या वाढेल आणि मजूरांनाही

## रोजगार हमी योजने अंतर्गत ३ लाख दिनाचे उद्दिष्ट

अधिक मजूरी कमावता येईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

रोजगार हमी योजनेने समृद्धी बजेट इष्टांक जारी केले आहेत. यात मनुष्य दिनाचे उद्दिष्ट जवळपास दुप्पट करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या निती आयोगाने सप्टेंबर २०२१ मध्ये गरिबी निर्देशांकनुसार महाराष्ट्रात २१ पट अधिक गरीबी असल्याचे समजल्यानंतर त्याचे प्रमाण कमी करण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त कामे उपलब्ध करून देण्याचे ठरवले आहे. प्रत्येकाला जॉबकार्ड आणि वर्षभरात कमीत कमी १०० दिवस काम उपलब्ध करून देण्याचे ठरवले आहे. ग्रामीण भागात सार्वजनिक उपक्रमांसह खासगी कामेही हाती घेतली जाणार आहेत.

## वर्गणीदारासांठी सूचना

१. 'कर्मचारी टाइम्स' अंकाची वर्षिक वर्गणी ३०० रुपये असून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.
२. वर्गणी मनीऑर्डर, धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाईन किंवा युपीआयद्वारे स्वीकारली जाते. कार्यालयात प्रत्यक्ष रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.
३. वर्गणी भरताना सोबत स्वतःचे नाव, पत्ता सुवाच्य अक्षरात नोंद करणे, ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.
४. मनीऑर्डर स्लीप भरताना त्यावर संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.
५. 'कर्मचारी टाइम्स' कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशीरात उशीरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरु करण्यात येतो.
६. 'कर्मचारी टाइम्स' चे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बहुधा १ तारखेलाच पोस्टात दिले जातात. तेव्हा १५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रार प्रतीसह 'कर्मचारी टाइम्स' कार्यालयास कळवावे. अंक पाठविण्यात येईल. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.
७. एक महिना उलटून गेल्यानंतर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदविता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची नोंद घेतली जाणार नाही.
८. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली जात नाही, वारंवार कळवूनही पत्ता बदलला जात नाही, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वी अंक बंद झाला, अशा स्वरुपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे अवश्य करू शकता, त्याची दखल घेतली जाईल.
९. अर्धवट पत्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येत असतात, यापुढे सलग तीन महिने अंक परत येतील, त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवत नाही, तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.
१०. 'कर्मचारी टाइम्स' चे अंक किरकोळ विक्रीसाठी 'कर्मचारी टाइम्स' कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

**संपर्क :** राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, तळ मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई - ४०००३२.

**संपर्क :** ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६

**ईमेल :** karmacharitimes@gmail.com

**वेबसाईट :** www.karmacharitimes.com

# सातव्या वेतन आयोगाचे उर्वरित हप्ते व्याजासह

**मुंबई :** राज्यातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाचे हप्ते पाच समान हप्त्यांमध्ये प्रदान करण्यात येणार आहेत. सातवा वेतन आयोगाचा पहिला हप्ता जुलै २०१९ मध्ये अनुज्ञेय करण्यात आला दुसरा हप्ता जुलै २०२० मध्ये अनुज्ञेय होता परंतु कोरोना महामारीमुळे दुसरा हप्ता २०२१ मध्ये मिळाला व तिसरा हप्ता २०२२ मध्ये प्रदान करण्यात आला आहे. परंतु राज्यातील अनेक कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगचा पहिलाच हप्ता प्रदान झालेला नाही.

ज्या कर्मचाऱ्यांना प्रान खाते नंबर मिळालेले नाहीत, अशा कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग फरकाचे कोणतेही हप्ते प्रदान करण्यात आलेले नाहीत. अशा कर्मचाऱ्यांचे सर्व प्रथम प्रान खाते नंबर काढून घेतले जात आहेत. यानंतर फरकाचे हप्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

जे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत किंवा मृत्यू झालेल्या वारसास सातवा वेतन आयोगाचे सर्व हप्ते (पाचही हप्ते) व्याजासह देण्याबाबत राज्य शासनाकडून निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. या करीता राज्य शासनाकडून आवश्यक निधीची पूर्तता करण्यात येणार आहे.

राज्यातील ज्या कर्मचाऱ्यांचे सातवा वेतन आयोगाचा पहिला / दुसरा व तिसरा हप्ता शिल्लक आहे व ज्या आस्थापनेतील आहरण संवितरण अधिकाऱ्याने आवश्यक निधीची मागणी करण्यात आलेली होती. अशा कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग फरकाची रक्कम माहे जानेवारी महिन्याच्या वेतनासोबत अदा करण्यात येणार आहे या करीता राज्य शासनाकडुन सुमारे २५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली होती.

पान १ वरुन...

# बेमुदत संपाबाबत मोर्चेबांधणी सुरु





राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे शिष्टमंडळ सध्या मराठवाडा दौऱ्यावर असून लातूर, उस्मानाबाद अशा विविध जिल्ह्यांमधून सदस्यांना मार्गदर्शन करताना उपाध्यक्ष सुरेश आहेरकर, कोषाध्यक्ष रामदास शिराळे तसेच आरोग्य विभाग राज्य संघटक रामभाऊ पांचाळ.

# पशुसंवर्धन, वनसंरक्षक, तलाठी यांची २.९० लाख पदे रिक्त

**मुंबई :** शासनाची नोकर भरती संदर्भात उदासीनता दिसून येत आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य तर टांगणीला लागलेच आहे शिवाय ते निराशाकडे वळताहेत.

या उदासीनतेमुळे अनेक मुलांनी आत्महत्येला जवळ केले आहे. त्यामुळे याबाबत लवकर निर्णय घेण्यात यावा, अन्यथा रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय नाही, अशी भूमिका युवा शाही विद्यार्थी संघटनेचे तुषार देशमुख, भास्कर तळणे, राहुल बोकारे, लक्कीसिंग कोटतिर्थवाले, श्रीहरी मुंडकर, चंद्रकांत बोडके, राजु बोरगड पाटील यांनी घेतली आहे.

शासकीय कार्यालयांमध्ये रिक्त पदांचा मोठा अनुशेष निर्माण झाला आहे. गेल्या दहा वर्षात अ,ब,क,ड, या वर्गवारीत तब्बल २,८९,४६४ विविध विभागातील पदे आतापर्यंत रिक्त असल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाली आहे.

त्यामध्ये वर्ग एक २८७५४ वर्ग दोन २१,५९१, वर्ग तीन १,५०,१८९, वर्ग चारचे ७३६२६ कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, आधीच रिक्त पदे त्यात नवीन नोकर भरती नसल्याने अर्ध्याच कर्मचाऱ्यांवर शासकीय कामकाज चालवले जात आहे.

त्यामुळे प्रामुख्याने आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. पण त्यावेळी परीक्षेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाले. त्यामुळे ती परिक्षा रद्द करण्यात आली. त्या परीक्षेचे शुल्क राज्यशासनाकडे जमा आहे. यावर अनेक दिवसांचा कालावधी उलटून गेलाय. त्यावर प्रशासनाकडून पुन्हा परीक्षेचे आयोजन करण्यासंबंधी प्रयत्न होताना दिसत नाहीत. येत्या काळात त्यावर तात्काळ आयोजन करण्यात यावे.

सोबतच शेतीची निगडित महसूल विभागातील तलाठी पशुसंवर्धन, या सह वनविभाग या अंतर्गत येणाऱ्या कामासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागते. यातच एकाच तलाठ्यावर अनेक तलाठी सज्जांचा पदभार असल्याने शेतकऱ्यांना तलाठी वेळेवर उपलब्ध होत नाही. शिवाय ग्रामसेवकाचा अनेक पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने एकाच ग्रामसेवकाकडे तीन तीन ग्रामपंचायतींचा कार्यभार सोपवल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, यामुळे सर्वसामान्यांच्या फायलींचा प्रवास कमालीचा मंदावला आहे. याचा मोठ्या प्रमाणात त्रास शेतकरी, शेतमजूर, सर्वसामान्य, विद्यार्थी, नागरिक यांना भोगावा लागत आहे. सेवा कायद्याचे उल्लंघन प्रशासनाकडूनच होत आहे.

रिक्त पदांमुळे निकषांना हरताळ फासला जात आहे. यात लोकप्रतिनिधीही गांभीर्याने घ्यायला तयार नाहीत. फक्त आश्वासन मिळते. त्यामुळे त्वरित उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांना २५ लाख रुपये पर्यंत विमा

**मुंबई :** राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेमध्ये बदल करण्याबाबत वित्त विभागाकडून दि. २४ जानेवारी २०२३ महत्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

या निर्णयामुळे शासकीय कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांना संवर्गनिहाय १५ लाख रुपये ते २५ लाख रुपये पर्यंचा विमा लाभ मिळणार आहे. राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांकरीता कर्मचाऱ्यांच्या वर्गणीवर आधारित अशी राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना दि. ०४-०२-२०२३ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१ एप्रिल २०१६ पासून लागू करण्यात आली आहे.

राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना पुढे सुरु ठेवण्यास दि. १८.०२.२०१७ च्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

दि. ०१ एप्रिल २०२३ पासून राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी व राशिभूत रक्कम यामध्ये वाढ करण्यात येत असून व सदर वर्गणी राशीभूत रक्कम गटनिहाय निर्णयामध्य नमुद करण्यात रक्कम यामध्ये वाढ करण्यात येत असून व सदर वर्गणी राशीभूत रक्कम गटनिहाय निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

फेब्रुवारी महिन्याची वेतनाची देयके सादर झाल्यानंतर नियुक्त झालेले कर्मचारी तसेच ज्या कर्मचाऱ्यांची वर्गणी माहे फेब्रुवारी महिन्यामध्ये वसूल करण्यात आलेली नाही.

अशा कर्मचारी वर्गाला अपघात योजनेमध्ये घ्यावे किंवा समाविष्ट करणे, यासाठी योजना लागू होण्याच्या कालावधीनुसार वर्गणी खालीलप्रमाणे वसूल करण्यात येणार आहे.

योजनेतील सदर सुधारणेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्यांच्या अधिनस्थ वेतन देयकातून अपघात विमा वर्गणी माहे फेब्रुवारी २०२३ देय मार्च २०२३ च्या वेतनातून व तदनंतर दरवर्षी कपात करणे आवश्यक असणार आहेत.

कर्मचारी वर्गासाठी लागू करण्यात आलेल्या या विमा योजनेच्या माध्यमातून राज्य शासकीय कर्मचारी वर्गास अधिकाधिक संरक्षण देण्याचा प्रयत्न आहे तसेच त्यांच्या कुटुंबियांनाही त्यातून मदत करण्याचा उद्देश्य यामागे आहे.

## कर्माचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी

**भंडारा :** कामगार मंडळांतर्गत भंडारा शहरात प्रशासनाने ३८ हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी केली असल्याचे म्हटले आहे. या ठिकाणी एकूण कामगारांपैकी घरेलू कामगार बांधकाम कल्याणकारी मंडळा अंतर्गत ३० हजार ३१०,माथाडी मंडळ अंतर्गत ११४० बांधकाम कामगारांची नोंद करण्यात आली आहे. या सर्व कामगारांची चारित्र्य पडताळणी झाली असल्याचे सांगण्यात आले आहे. याबाबतचे अर्ज प्रशासनाकडे सादर झाले आहेत.

जिल्ह्यातील तीन मंडळे मिळून ३८ हजार १५० कामगारांची नोंदणी आहे. बांधकाम कामगार नोंदणी केल्यावर अर्ज पोलिसांकडे पाठविण्यात येतात. पोलिस विभागाकडून पडताळणी करण्यात येते.

# २८ ग्रामसेवकांची वेतनवाढ रोखली
# सीईओंनी घेतला निधी खर्चाचा आढावा
## विकास आराखड्यातील निधी खर्च न केल्याचा ठपका
### सुनावणीलाही ग्रामसेवकांची गैरहजेरी; मिळाली 'कारणे दाखवा' नोटीस

**अमरावती :** केंद्र राज्य सरकाराकडून ग्रामपंचायतींना दरवर्षी पंधराव्या वित्त आयोगातून ८० टक्के निधी विकास आराखड्यानुसार कामांसाठी दिला जातो. मात्र, हा निधी अद्याप ५ टक्केही खर्च न केला नसल्याचा धक्कादायक प्रकार आढळून आला आहे.

त्यामुळे २८ ग्रामसेवकांची तात्पुरती वेतनवाढ रोखली आहे. याबाबतचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत. याप्रकरणी ३० जणांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

केंद्र व राज्य सरकारकडून पधंराव्या वित्त आयोगामधून विविध टप्प्यात निधी उपलब्ध करून दिला जातो. यामधे जिल्हा परिषद व पंचायत समितीला प्रत्येकी १० टक्के तर ग्रामपंचायतींना ८० टक्के निधी हा लोकसंख्येच्या प्रमाणात दिला जातो. याकरिता शासनामार्फत जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाला निधी विविध टप्प्यात मिळाला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित ग्रामसेवकांची आपल्या दालनात १२ जानेवारी रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीला एकही ग्रामसेवक हजर राहिला नाही. त्यामुळे ३० ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तर २८ ग्रामसेवकांची तात्पुरती वेतनवाढ रोखण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत पंधराव्या वित आयोगाचा निधी खर्च हा ५ टक्क्यांच्या आत खर्च झाल्याने आढाव्यात दिसून आले. त्यामुळे संबंधित ग्रामसेवकांची सुनावणी लावली होती. मात्र, एकही जण हजर झाला नाही. परिणामी, कारणे दाखवा नोटीस व तात्पुरती वेतनवाढ रोखण्याचे आदेश दिले गेले आहेत.

वित्त आयोगाच्या निधीमधून तसेच ग्रामपातळीवर विकास आराखड्यानुसार व शासनाने ठरवून दिलेल्या कामांवर विहीत मुदतीत खर्च करणे अपेक्षित आहे. परंतु, या सर्व गोष्टींचा विचार न करता अमरावती जिल्हातील ग्रामपंचायतींच्या वित्त आयोगातील निधी खर्चाचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला.

यावेळी जिल्हातील अनेक ग्रामपंचायतीच्या निधी खर्चाचे प्रमाण हे ५ टक्क्यांच्या आत असल्याचे आढळून आले आहे. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. निधीचा विनियोग योग्य प्रकारे होणे गरजेचे आहे, असेही मत व्यक्त होत आहे.

# होळीसाठी कोकणात एसटीच्या अतिरिक्त २५० बसेस धावणार

**मुंबई :** यंदाच्या वर्षीही मुंबईतून जाणाऱ्या चाकरमान्यांचा शिगमा विनाविघ्न पार पडावा यासाठी एसटी महामंडळाने नियमित बसेस व्यतिरिक्त २५० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ३ मार्च ते १२ मार्च या कालावधीत या गाड्या कोकणातील मार्गावरून धावणार असल्याची माहिती एसटी महामंडळाकडून देण्यात आली.

होळीचा सण कोकणात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सणासाठी मुंबईहून लाखो चाकरमानी कोकणातील आपापल्या गावी जात असतात. मुंबई सेंट्रल, परळ, कुर्ला,ठाणे, बोरिवली, वसई, नालासोपारा, पनवेल येथील बसस्थानकांतून रत्नागिरी, सिंधुदुर्ग सावंतवाडी, मालवण आदी भागात जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.



तंत्रशिक्षण विभागाच्या नाशिक येथे राज्यस्तरीय क्रीडास्पर्धा उत्कृष्टपणे पार पाडल्याबद्दल राज्य अध्यक्ष सुरेश कर्पे, संघटनेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करतांना मध्यवर्ती संघटनेचे पदाधिकारी

# अंगणवाडी भरतीच्या ऑनलाईन प्रक्रियेला सुरुवात

**मुंबई :** राज्य शासन सतत कोणत्या ना कोणत्या योजना तसेच भरती अमलात आणत असते. अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे आणि अंगणवाडी सेविकाला कामाचा ताण येत असतो. याचा विचार करून आणि मागणी वरून अंगणवाडी रिक्त पदे तत्काळ भरती करण्यात येणार आहे. या भरतीचे ऑनलाईन अर्ज सुरु देखील सुरु करण्यात आले आहे.

आजही खेड्यापाड्यातील महिला व बालकांसाठी अंगणवाडीचे काम महत्त्वाचे व मोलाचे मानले जाते. याशिवाय जिल्ह्यात आजारपणामुळे अनेक पदे रिक्त झाली असल्याने अंगणवाड्यांचे कामकाज विस्कळीत झाले होते. त्यामुळे वेळोवेळी रिक्त पदे भरण्याची मागणी जिल्हा परिषद व लोकप्रतिनिधींनी केली होती. अंगणवाडी सेविकांच्या १७९, मदतनीसांच्या ७३८ तर मिनी अंगणवाडी सेविकांच्या २२ जागा रिक्त वर्षापूर्वी रिक्त होत्या. सेवक, मिनी सेवक व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. काही जिल्ह्यामध्ये ५० टक्के भरण्यात आली होती.

मात्र, मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याने योजनांच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम झाला. त्यामुळे शासन निर्णयानुसार २० हजार १८३ रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# एसटी सक्षम करण्याचा नुसत्याच गप्पा!
## महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस संघटनेचा राज्य सरकारवर आरोप

**मुंबई :** सद्यस्थितीत राज्यात असलेले शिंदे-फडणवीस सरकारसुध्दा केवळ एसटी सक्षम करण्याच्या वल्गना करत आहेत. या सरकारने अद्याप सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती केलेली नाही. गेले सात महिने शिल्लक रकमेतील एकही पैसा दिला नाही. याशिवाय दर महिन्याला कर्मचाऱ्यांना वेतनासाठी लागणारी रक्कम सुद्धा अपुरी दिली असून त्यामुळे पीएफ, ग्रॅज्युएटी, बँक कर्ज रक्कम, पतपेढी कर्ज रक्कम सुद्धा अंदाजे ६५० कोटी रुपये इतकी थकीत असून. एसटी कर्मचाऱ्यांना मदत करण्याच्या व एसटीला मदत करण्याच्या निव्वळ गप्पा मारल्या जात आहेत. प्रत्यक्षात मात्र तोंडाला पाने पुसली जात असल्याचा आरोपही बरगे यांनी केला आहे.

एसटी सक्षम करण्याच्या सरकार व राजकारणी निव्वळ पोकळ गप्पा मारीत असून करकार कुणाचेही असले, तरी प्रत्यक्षात मात्र महाराष्ट्राची रक्तवाहिनी समजल्या जाणाऱ्या लालपरीचे विविध कर रूपाने वर्षानुवर्षे शोसन केले जात आहे. वर्षाला अंदाजे ३ हजार कोटी रुपये कर वसूल केले जात असल्याची घणाघाती टीका महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे.

एसटीच्या एकूण बजेटच्या ३५ टक्के रक्कम ही कर रूपाने भरली जात आहे. वर्षाला अंदाजे तीन हजार कोटी रुपये इतकी रक्कम कर रूपाने वर्षानुवर्षे भरली जात आहे.अंदाजे ३००० कोटी रूपये इतकी रक्कम सरकारकडे जात आहे. या महामंडळाला सर्व करातून सूट देण्यात आली पाहिजे. पण दुर्देवाने तसे घडत नसल्याचे बरगे यांनी सांगितले.

## जुन्या पेन्शनसाठी हस्ताक्षर अभियान

**भुसावळ :** जुन्या पेन्शन योजनेसाठी संरक्षण कामगारांनी देशव्यापी हस्ताक्षर अभियान सुरु केले आहे. आयुध निर्माणी, भुसावळ येथे अखिल भारतीय संरक्षण कामगार महासंघाशी संलग्न ऑ. फ. कामगार युनियनच्या वतीने हस्ताक्षर अभियान सुरु करण्यात आले आहे. नॅशनल जॉईंट कौन्सिल फॉर एक्शनच्या आदेशावरून हे अभियान सुरु आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉ. आशिष मोरे, नितेश तायडे, प्रमोद तावडे, सुनील बाविस्कर, संजय दांडगे, विनोद पवार आदी मेहनत घेत आहेत.

# आयुर्वेद महाविद्यालयांत पदव्युत्तर जागांमध्ये घट!

**नागपूर :** भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाने राज्यातील सर्वच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांतील शिक्षकांची रिक्त पदांसह इतर त्रुटी बघून पदवीचे प्रवेश थांबवले होते. वैद्यकीय शिक्षण खात्याने झटपट कंत्राटी शिक्षक भरल्याने या जागा वाचल्या. परंतु, कंत्राटी शिक्षकांना मार्गदर्शक (गाईड) म्हणून मान्यता नाही. त्यामुळे गेल्यावर्षीहून यंदा राज्यात आयुर्वेदच्या विविध विषयातील पदव्युत्तरच्या जागा निम्म्याने घटल्या आहेत.

राज्यात नांदेड, उस्मानाबाद, मुंबई, नागपूर, जळगाव आणि बारामती ही शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालये आहेत. नुकतेच भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाने महाविद्यालयातील या सर्वच महाविद्यालयांचे निरीक्षण केले होते. त्यात प्राध्यापकांच्या रिक्त जागा, रुग्णालयातील कर्मचारी व रुग्णशय्यांचा अभाव असल्याचे पुढे आले. यामुळे या महाविद्यालयातील पदवीच्या ५६३ आणि पदव्युत्तरच्या २६४ जागांचे प्रवेश थांबवण्यात आले होते. त्यावर आयुष संचालक आणि महाराष्ट्र शासन यांनी न्यायालयात जागा भरण्यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र सादर केले.

या घडामोडीनंतर भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाने प्रवेशबंदी उठवली. त्यानंतर शासनाकडून झटपट सर्व महाविद्यालयांत रिक्त जागेवर प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली. त्यामुळे या महाविद्यालयांतील पदवीच्या जागा वाचल्या. परंतु, या कंत्राटी शिक्षकांना मार्गदर्शक म्हणून मान्यता नाही. त्यामुळे नागपूर, नांदेड, उस्मानाबाद, मुंबईच्या आयुर्वेद महाविद्यालयांतील २१ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या सिट मॅट्रिकनुसार असलेल्या २४९ पदव्युत्तर जागांची संख्या २३ जानेवारी २०२३ रोजीच्या सिट मॅट्रिकनुसार केवळ ११८ पदव्युत्तर जागांवर आली. त्यामुळे राज्यात आयुर्वेदमधील विविध पदव्युत्तरच्या जागा तब्बल १३१ जागांनी कमी झाल्या. या जागा कमी झाल्याचा फटका येथील पदव्युत्तरला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना बसणार आहे.मूळात जागा भरल्या जात नसल्यामुळे मोठी गैरसोय तर होत आहेच शिवाय त्याचा अभ्यासक्रमावरदेखील परिणाम होताना दिसून येतो.

# जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने कर्तृत्ववान प्रशासकीय महिलांचा सन्मान

## कर्तृत्व तयांचे



## मनिषा म्हैसकर

राज्य सरकारने सहा सनदी अधिकाऱ्यांना बढती दिली आहे. भारतीय प्रशासन सेवेत असलेल्या १९९२ च्या तुकडीतील या अधिकारी वर्गात मनिषा पाटणकर-म्हैसकर, मिलिंद म्हैसकर, राजगोपाल देवरा, बिपीन श्रीमाली, सीमा व्यास याचा समावेश आहे.

यात मनीषा म्हैसकर यांनी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव म्हणून काम केले आहे. मराठी भाषाा, राजशिष्टाचार, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय आणि अन्य अनेक महत्वाच्या विभागात आणि जबाबदारीच्या पदांवरील कामाचा त्यांचा अनुभव आहे.

मनीषा म्हैसकर - पाटणकर यांचं शिक्षण नागपूरला झालं. वडील सरकारी अधिकारी, त्यामुळे त्यांच्या सतत बदल्या व्हायच्या. बारावी सायन्सला चांगले मार्क्स मिळाल्यानंतर त्यांनी मेडीकलला प्रवेश घेतला. पण काही दिवसांतच या क्षेत्रात रस नसल्याचं जाणवलं. मग त्यांनी लॉ कॉलेज गाठलं. घरातल्या प्रशासकीय सेवेच्या वातावरणामुळे आयएएस व्हायचं नक्की केलं होतं. लॉच्या शेवटच्या वर्षाला असताना वडिलांची मुंबईला बदली झाली आणि सगळं पाटणकर कुटुंबच मुंबईत आलं. स्टेट इन्स्टिट्यूट फॉर ॲडमिनिस्ट्रेटीव करिअर्स (एसआयएसी) या नावाजलेल्या संस्थेत १९९० मध्ये त्यांनी प्रवेश घेतला.

मनीषा म्हैसकर यांचे वडिल अरुण पाटणकर. त्यांनी दिलेल्या पुस्तकी ज्ञानाइतकेच किंबहुना त्याहून अधिक मोलाचे ठरणारे ते त्यांचे मार्गदर्शन. जे काम करायचं ते चांगलंच करायचं. पुढे आयएएसचा अभ्यास करताना या लाइफ मंत्रांचा त्यांचा उपयोग झाला आणि आजही होत आहे. त्यांच्याकडे पर्यावरण विभाग असो किंवा राजशिष्टाचार विभाग असो. जे काम करायचं ते उत्तमच. ही त्यांची शिकवण त्यांना आजही उपयोगात येते. नुकत्याच वरळी येथे झालेल्या मराठी विश्व संमेलनाची जबाबदारीदेखील त्यातूनच त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली आणि हे संमेलन जगभर प्रसिद्ध झाले.

उत्तम, अचूक कामाच्या अट्टहासापायी काहीच कृती न करणं हेही अयोग्य, याच्यावर त्यांचा विश्वास आहे. एखाद्या मोठ्या योजनेची अंमलबजावणी अपेक्षेइतकी उत्तम नाही झाली, तरी किमान चांगलं काम तरी आपण करायला हवं याचं भान बाबांच्या शिकवणुकीतूनच मिळालं.

पर्यावरण विभागात त्यांनी माझी वसुंधरा योजना राबविली. पृथ्वीतत्त्वानुसार जमिनीवर हिरवाई पसरवूया, वृक्षारोपणाचा विस्तार करूया, वायुतत्त्वानुसार हवेच्या प्रदूषणाला आळा घालूया, अग्नितत्त्वानुसार सौरऊर्जेचा वापर करूया, जलतत्त्वानुसार जलसंधारण योजना राबवूया व नद्यांचं प्रदूषण कमी करूया आणि आकाशतत्त्वानुसार या सर्वच योजनांचा प्रचार आणि प्रसार करूया असं नियोजन त्यांनी यशस्वीपणे राबविले.

प्रत्येक वेळी आपल्या मनासारखं घडेलच असं नाही. परिस्थिती अनुकूलच असेल असंही नाही. पण प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा शांतचित्तानं पुढे कसं जायचं हा विचार महत्त्वाचा! यावर त्यांची श्रद्धा आहे.

विपरीत परिस्थितीत लोक टीका करतातच. पण त्याने नाउमेद न होता, आपल्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून ताठ मानेनं चालत राहायचं. त्यांच्या प्रशासकीय सेवाकाळात असे प्रसंग अनेकदा आले पण या शिकवणीचाही त्यांच्यावर परिणाम आहे. त्यांनी ही आव्हाने आतापर्यंत पेलली आहे.

नवी जबाबदारीदेखील त्या यशस्वी करतील. आपला ठसा यापुढेही उमटवतील, त्यासाठी त्यांना '**कर्मचारी टाइम्स**'कडून शुभेच्छा....



## जयश्री भोज

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय या विभागाचे महत्व विशेष आहे. शासकीय कामकाजाची माहिती प्रसारमाध्यमांपर्यंत योग्यरित्या पोहचवून शासनाची प्रतिमा जनमानसात अधिक प्रभावी करण्याचे शिवधनुष्य या विभागाच्या प्रमुखाला पेलावे लागते. शासनाच्या प्रत्येक विभागाला माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या माध्यमातून आपल्या कार्याला जनतेपर्यंत पोहचवायचे असते. अशावेळी या प्रत्येक विभागाशी योग्य समन्वय साधून त्यांची माहिती दैनंदिन स्वरुपात राज्यातील सर्व प्रसारमाध्यमांपर्यंत पोहचवली जात आहे. शासनाचे काम जनतेपर्यंत आणि जनतेच्या भावना शासनापर्यंत पोहचवणारा दुवा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे काम महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. ही यशस्वी जबाबदारी महासंचालक जयश्री भोज या लिलया पेलताना दिसून येत आहेत. त्यामुळे शासकीय योजनांची व्यापकता आणि गतिमानता जनतेसमोर सादर होत आहे. अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम, कल्पना राबवत तसेच सातत्याने सर्तक राहून या विभागाचे काम सुरु आहेच परंतु हे करत असताना अतिशय महत्वपूर्ण आणि सृजनशील राहण्यावरदेखील त्यांचा भर आहे.

भारतीय प्रशासकीय सेवेच्या २००३ मधील तुकडीच्या अधिकारी असलेल्या जयश्री भोज यांनी यापूर्वी नागपूर जिल्हा सहाय्यक जिल्हाधिकारी, चंद्रपूर जिल्हा उप विभागीय अधिकारी, नागपूर जिल्ह्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी, भंडारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वर्धा येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ याच्या व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांनी कामकाज सांभाळलेले आहे. त्यावेळी शासनाच्या ध्येयधोरणानुसार कार्याची आखणी तसेच त्यांची वृतिशील अंमलबजावणी करण्यावर त्यांचा सातत्याने भर राहिला होता. आजदेखील त्यांच्या कामाची पद्धत आणि शैली ही त्यादृष्टीने अनुकूल आणि प्रभावी असल्याचे दिसून येते. मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तपदी जयश्री भोज यांची राज्य शासनाने नियुक्ती देखील केली होती. त्या काळात देखील त्यांनी मुंबईच्या महत्वाच्या प्रश्नांवर व्यापक आणि प्रभावशाली काम केले आहे. मुंबई महानगरपालिकेचा कारभार सांभाळणे ही तारेवरची कसरत असून त्यासाठी अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. पण धडाडी आणि मेहनतीने कार्य करणाऱ्यांना ते सहज शक्य होते. त्याचाच प्रत्यय त्यांच्या कार्यातून त्या काळात मुंबईकरांना आला. आंतरराज्य प्रतिनियुक्तीवर असताना २०१२ ते २०१७ या कालावधीत त्या कानपूर (उत्तर प्रदेश राज्य) विकास प्राधिकरणच्या उपाध्यक्ष आणि उत्तर प्रदेश लघु उद्योग निगमच्या निर्देशकही होत्या. जून २०१७ पासून त्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर कार्यरत होत्या.आपल्या प्रत्येक जबाबदारीवर त्यांनी केलेले कार्य हे परिणामकारक राहिले आहे. त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली आहे. त्यामुळेच त्या यशाची एकेक शिखरे पादाक्रांत करत राहिल्या.

शासनाच्या प्रत्येक विभागात त्यांनी आपली ठसा उमटवला असल्यामुळे त्यांचा भविष्यकाळदेखील उज्वल आहे. भविष्यात त्यांच्याकडून महाराष्ट्रातील जनतेसाठी भरीव कार्य होईल, हे निश्चित.



## अश्विनी भिडे

मेट्रोचे जाळे तयार करून मुंबईकरांना रोजच्या प्रवासाच्या दगदगीपासून वाचविण्यासाठी जे महापराकोटीचे आव्हान पेलण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या शासकीय सेवेतील प्रशासकीय अधिकारी म्हणजे अश्विनी भिडे. आंतरराष्ट्रीय शहर असलेल्या मुंबईला अधिक गतिमान करण्यासाठी मेट्रो लवकरच जनतेच्या सेवेत दाखल होत आहेत. उर्वरित कामकाजदेखील अत्यंत झपाट्याने सुरु आहे. हे सारे त्यांच्या अथक परिश्रमातून, नियोजनातून आणि कौशल्यपूर्ण अंमलबजावणीतून शक्य होत आहे.

सांगली सारख्या निमशहरी गावात मराठी माध्यमात शिकलेली, दहावी- बारावी गुणवत्ता यादीत आलेली, मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेली पण सुरुवातीपासूनच वेगळं काहीतरी करायचं होतं त्यामुळे इंजिनिअरिंग, मेडिकलच्या वाटांवर न जाता कला क्षेत्रात त्यांनी प्रवेश घेतला आणि नंतर स्पर्धा परीक्षा दिल्या. त्यामुळे झपाटल्यासारखा अभ्यास केला. लेखी परीक्षा, मुलाखत असे टप्पे पार करत अश्विनी १९९५ बॅचमध्ये भारतात महिलांमध्ये प्रथम आल्या.

सुरुवातीच्या काळात इचलकरंजी, सिंधुदुर्ग अशा ठिकाणी काम करत २००० मध्ये नागपूरला त्या जिल्हा परिषदेमध्ये चिफ ऑफिसर म्हणून बदली झाली. तत्पूर्वी १९९९ मध्ये आयएएस अधिकारी असणारे डॉ. सतीश भिडे यांच्याशी त्यांचे लग्न झाले. नागपूरमध्ये अश्विनीच्या शासकीय कारकिर्दीला खऱ्या अर्थाने एक वळण मिळालं. त्यांनी विकासकामांबरोबरच कमी खर्चात लघु जलसिंचन करणारे बंधारे उभारण्यावर भर दिला. वनराई या संस्थेच्या मदतीने ही काम केली. त्याला चांगलं यश मिळालं.


आज या बंधायांची नोंद अश्विनी बंधारे अशी झालेली आहे. ही त्यांच्या कामाची; कामावर असणाऱ्या प्रेमाचीच पोच आहे. या उल्लेखनीय कामाबद्दल कौतुक तर झालंच पण या मोहिमेकडे सगळ्यांचे लक्ष वेधलं गेलं. जे काम पूर्वी एनजीओ करीत ते शासनाने हाती घेतलं. हा प्रश्न अधोरेखित झाला. धोरणकर्त्यांनी याबाबत काही मूलभूत गोष्टी लक्षात घेतल्या आणि या आधारेच ग्राउंड वॉटर कॉन्झर्वेशन या कायद्याची अंमलबजावणीही झाली. यानंतर महाराष्ट्राच्या राज्यपालांची उपसचिव म्हणून त्यांनी अतिशय महत्त्वाची कामे केली. विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्याचं प्रलंबित काम त्यांनी कमी कालावधीत पूर्ण केलं. प्रसंगी ठाम भूमिका घेतली. त्यांच्या काही निर्णयांना तत्कालीन राज्यकर्त्यांनी आव्हानही दिलं पण न्याय्य भूमिका हेच कामाचे सूत्र असल्याने तिला पाठिंबा मिळत गेला. एमएमआरडीए विभागाची जबाबदारी आल्यावर मात्र समोरचं आव्हान जसं वाढलं तसंच क्षितिजही विस्तारलं. साहित्यामध्ये एम.ए केलेल्या अश्विनी आता इंजिनिअरिंगचे धडे समजून घेऊ लागल्या. जटिल इंजिनीअरिंग ड्रॉइंगचा अभ्यास केला. याच काळात मुंबईकरांच्या आयुष्यात मोठा बदल घडवणारे अनेक प्रकल्प पूर्ण झाले. इस्टर्न फ्रीवे, सहारा एलिव्हेटेड रोड हे सर्व त्यांच्याच कार्यकाळात पूर्ण करण्याचं समाधान मिळालं. रोजचा दिवस नवं काहीतरी घेऊन येतो. खूप काही नवीन शिकायला ही मिळतं आणि प्रयत्न प्रामाणिक असतील तर उत्तरही मिळतात.



## लीना बनसोड

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने नुकत्याच ४४ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. यात नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड यांचीही बदली करण्यात आली आहे. नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांचाशेवटचा दिवस होता. यावेळी लीना बनसोड यांना जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचारी यांनी निरोप दिला. या निरोपाच्या दरम्यान उपस्थित असलेले अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अश्रू अनावर झाले होते. यावेळी निरोप समारंभवेळी अधिकारी आणि कर्मचारी वर्गाकडून निरोपाच्या दरम्यान अश्रू अनावर झालेले पाहून लीना बनसोड यांना देखील अश्रु अनावर झाले होते. शासकीय सेवेत असतांना अनेकदा कठोर निर्णयामुळे आयएएस अधिकाऱ्यांना त्यांच्या हाताखालील अधिकारी, कर्मचारी हे दुखावले जात असतात. परंतु, काही अधिकारी आपल्या स्वभावाने आणि कामाच्या पद्धतीने हाताखालच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मन जिंकून जात असतात. आणि हे सिद्ध कधी होते तर त्यांची बदली झाली की त्यांच्या निरोप समारंभाच्या वेळी किंवा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमाला. अडीच वर्षाच्या कार्यकाळात लीना बनसोड यांनी जिल्हा परिषदेतील अधिकारी, आणि कर्मचारी बनसोड या विदर्भातील वाशिम जिल्हा परिषदेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करत होत्या. त्या ठिकाणी त्यांनी आपला कारभार अधिकाधिक गतिमान ठेवण्यावर भर दिला होता. अत्यंत कल्पक आणि काम करण्याची सचोटी हे त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्टय राहिलेले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेले कार्य लक्षणीय होते. कोणत्याही कामकाजासाठी थेट जिल्हा परिषदेत न येता ई मेल द्वारे तक्रारी करण्याची त्यांनी आवाहन केले.त्यातून कोरोनाला प्रतिबंद करण्याचा हेतू होता. त्याचबरोबर त्यांनी जनतेमध्ये जावून कोरोनाबद्दल मार्गदर्शन केले. शासकीय उपाययोजनांची माहिती दिली. नाशिकमध्ये केलेल्या कोरोना उपाययोजनांचे एक मॉडेल तयार झाले. व्यवस्थापन आणि नेतृत्व यांचे उत्तम उदाहरण त्यातून दिसून आले. त्यांच्या याच मॉडेलचे अनुकरण नंतर इतरांकडून केले गेले. हार्वर्ड विद्यापीठात नेतृत्व विकास या विषयावर त्यांचे शिक्षण झाले आहे. तिथे शिकत असताना त्यांना जगभरातील विद्यार्थी वर्गासमवेत संवाद साधण्याची संधी मिळाली. प्रशासकीय कामकाजाचा त्यांचा अनुभव काय असतो, हे शिकण्याची संधी त्यांना मिळाली होती. अनुभवाची आदान-प्रदान करता आली. विकासात कोणती आव्हाने असतात, ती कशी सोडवावीत, याबाबत प्रत्येकाचा दृष्टीकोन अनुभवता आला. त्याचबरोबर त्यांनी आपल्या सहकाऱ्यांमध्ये देखील नेतृत्व गुणवत्ता विकसित व्हावी, यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे कामे अधिकपणे प्रभावी होतात, प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने स्वत:ला विकसित करून हे काम करू शकतो, यावर त्यांचा विश्वास आहे.आदिवासींमधील कुपोषण कमी व्हावे, महिलांना डोक्यावर हंडा घेऊन पाणी भरायला जाण्याची वेळ येऊ नये, तसेच घराघरापर्यंत नळ पोहचवणे, शासनाच्या सर्व योजना जनतेपर्यंत पोहचवून त्यांना त्याचा लाभ मिळवून देण्याचा त्यांचा निर्धार आहे.



## मंगल नाखवा

आपल्याला आयुष्यात काही व्यक्ती भेटतात, ज्यांची ओळख सर्वार्थाने अष्टपैलू म्हणून करुन घेता येते. अशीच एक व्यक्ती, आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर सामाजिक, सांस्कृतिक, कला विश्वात आपली ओळख निर्माण करुन सर्वांना सुपरिचित आहे, ती म्हणजे मंगल नाखवा.

डोंगरी येथे वाघमारे या कोळी दाम्पत्याच्या घरी तिसरे कन्यारत्न म्हणून जन्माला आलेली मंगल तिचे माहेरचे नाव मंगला.

मंगल लहानपणापासूनच सर्वांची लाडकी. आईची प्रेमळ सखी आणि वडिलांच्या काळजाचा तुकडा. लहान असतानाच कला क्षेत्रात ती आपली चुणूक दाखवू लागली. नृत्य परंपरेनुसार नृत्य रक्तात होतेच. शालेय शिक्षण दादर येथील मुलींच्या पोतदार शाळेत झाले. त्यानंतर एम.ए. पर्यंतचे कॉलेज महाविद्यालयीन शिक्षण रुपारेल महाविद्यालयात झाले. तिथेही तिने स्टेज गाजवलेत. त्यानंतर नोकरीचा प्रवास सुरु झाला.

मंत्रालयात सन १९९२ मध्ये लिपिक पदावर रुजू झाल्या. मंत्रालय कर्मचारी संघटनेने १९९५ साली आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात एका बहारदार ठाकर नृत्यात आपली चुणूक दाखवली. याच वर्षी सचिवालय जिमखान्यात राज्य नाट्यय स्पर्धेतही तिने पदार्पण केले. आतापर्यंत ५ अखिल भारतीय नागरी संगीत व नृत्य स्पर्धांमध्ये मंगल हिचा सहभाग होता. आणि प्रत्येक वेळेस महाराष्ट्र संघास समूह नृत्याचा पुरस्कार मिळवून दिलेला आहे.

अखिल भारतीय सांस्कृतिक संघ, पुणे येथील एकांकिका स्पर्धेत भरत लब्दे लिखित आणि सुनील सुर्वे, शैलेश म्हापसेकर दिग्दर्शित, ''हिसाब बाकी आहे'' या ताज हॉटेलवर झालेल्या दहशतवादी अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवरील एकांकिकेतील भूमिकेसाठी राष्ट्रीय स्तरावरील ४२ नाटकांमधून सर्वोत्कृष्ट अभिनयाचे प्रथम पारितोषिक मंगलने पटकावले. तिने मंत्रालय कर्मचारी संघटनेत दोन वर्षे उपाध्यक्षा म्हणून काम केले आहे.


२०१४ मध्ये सचिवालय जिमखान्याच्या कार्यकारिणी समिती सदस्यांसाठी असलेल्या निवडणूकीच्या रिंगणात उतरली. निवडणूकीच्या पहिल्याच प्रयत्नात निवडून सचिवालय जिमखान्याच्या कार्यकारिणी समितीच्या सचिव पदावर नियुक्त झाली. सचिवालय जिमखान्याच्या निवडणूकीत २०१७ मध्ये तिच्या दुसऱ्या सत्रात १०२१ इतक्या विक्रमी मताधिक्याने ती विजयी झाली तर २०२२ मध्ये तिसऱ्या सत्रात ११५९ इतक्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाली.

दि महाराष्ट्र मंत्रालय अँड अलाईड ऑफिसेस को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई च्या निवडणूकीत सन २०२० मध्ये संचालक पदासाठी झालेल्या निवडणूकीमध्ये १४५६ इतक्या मताधिक्याने विजयी झाली. तिथेही तिने आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.

त्यामुळे मॅको बँकेने मंगल नाखवा हिच्या नावाची शिफारस केली आणि तिची निवड दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बॅंक्स असोसिएशनच्या संचालक पदी करण्यात आली आहे.

मुलगी समृद्धी बी.ई. झाली असून त्यांचा धाकटा मुलगा बी.फार्मच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे. पती व मुलांच्या पूर्ण सहकार्यामुळे आणि पाठिंब्यामुळे मंगलच्या हातून नानाविध सामाजिक कार्ये होत आहेत.


## ।। तेरावे पुण्य स्मरण ।।



स्व.सौ.निना सुरेश आहेरकर

स्व.दि.१९ फेब्रुवारी २०१०

परिवाराच्या सुख व समाधानासाठी
तुम्ही कायम संघर्ष केला, तुमच्या
स्मृती कायम आमच्या सोबत आहेत,
तुमच्या स्मृतीदिना निमीत्त

भावपूर्ण श्रद्धांजली

:: आपला शोकाकुल स्नेहपूर्ण पारिवार ::

सुरेश सोनाजी आहेरकर (पती)

सौ.दिक्षा संजय मंझा (मुलगी - जावई)
कु.शरयू सुरेश आहेरकर (मुलगी)
कु.समिक्षा,सफल संजय मंझा

श्रीमती मृदूला विजय भोसले (मुलगी)
सौ.नुपूर राजेंद्र जाखडे (मुलगी-जावई)
कु.जिज्ञासा भोसले (नाती)

एम.एम.भाऊसाहेब पठाण राज्य अध्यक्ष
तसेच आहेरकर मंझा,जाखडे व मित्र परिवार

'निनाई' निवास,पहाडसिंगपूरा,औरंगाबाद. मो.7972927015



♦ संपादक : एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण ♦ कार्यकारी संपादक : अशोक रामचंद्र शिंदे प्रकाशक-मुद्रक : श्री.एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण यांनी कर्मचारी टाइम्स हे मासिक राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ साठी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीअल इस्टेट, केशवराव खाड्ये मार्ग, जेकब सर्कल, मुंबई ४०००११ येथे छापून राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले. शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त. ♦ संपर्क संपादकीय : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६, जाहिरात : ९८९०९१६५८८, ७९७२९२७०१५ वितरण : ९८९०९१६५८८, ९५०३५७९५५२ ईमेल : karmacharitimes@gmail.com वेबसाईट : www.karmacharitimes.com ♦ सर्व कायदेशीर बाबी मुंबई न्यायालयाच्या कक्षेत ♦ (प्रेरणास्थान : आदरणीय कै. र.ग.कर्णिक, संस्थापक : भाऊसाहेब पठाण)

Editor : M.M. Alias Bhausaheb Pathan Executive Editor : Ashok Ramchandra Shinde Publisher Printer : Shri. M.M. Alias Bhausaheb Pathan printed the magazine 'Karmachari Times' for State Government Group D (Class IV) Employee Central Federation at Plascote Industries, 23 Municipal Industrial Estate, Keshavrao Khadye Marg, Jacob Circle, Mumbai 400011. State Government Group D (Class IV) Employees Central Federation, 9, New Administration Building, Ground Floor, Madam Cama Marg, Opposite Mantralaya, Mumbai 400032. Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India. ♦ Contact - Editorial : 9890916588, 9821374626 ♦ Advertisement : 9890916588, 9503579552 ♦ Distribution : 9890916588, 9503579552

E-mail : karmacharitimes@gmail.com Website : www.karmacharitimes.com ♦ All Legal matter subject to Mumbai Jurisdiction